
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
४५२४

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क्र. ४५२४

BVBK-0404524




BVBK-0404524

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा-वा
दा. क्र. ४५२४

# प्रास्ताविक

‘ समाज शिक्षण माला ’ सुरू होऊन दोन वर्षे झाली. मालेने आतापर्यंत २४ पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. आता ‘ माणसांचे मूलभूत हक्क ’ हे मालेचे तिसऱ्या वर्षाचे पहिले व एकूण पंचविसावे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. पंचविसावे पुस्तक म्हणजे रौप्य-महोत्सवाचे पुस्तक होय. हा महोत्सव आज ता. २६ सप्टेंबर रोजी होत असल्याने हे पुस्तक थोडे लवकर प्रसिद्ध होत आहे.

हे पुस्तक आहेही तसेच महत्त्वाचे. आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाला आपले हक्क तरी कोणते आहेत, हे कळणे जरूर आहे. हे पुस्तक हे हक्क चांगल्या रीतीने समजावून देईल. मालेच्या नेहमीच्या पुस्तकांच्या मानाने हे पुस्तक दुप्पट झाले असूनही ते आम्ही कायम वर्गणीदाराना त्यांच्या वर्गणीतच देत आहो. ह्या पुस्तकाचे लेखक डॉ. अप्पासाहेब गणपतराव पवार हे एम्. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी., बार ॲट् लॉ असून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे व गुजरायेतील विसनगरच्या कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून त्यानी काम केले आहे. विसनगर येथे असतानाच आमच्या विनंतीस मान देऊन त्यानी मालेसाठी हे पुस्तक लिहून दिले आहे. आता डॉ. पवार हे पुण्याला डेप्युटी डायरेक्टर ऑफ् एज्यु. म्हणून बदलून आलेले आहेत.

ह्या पुस्तकाने मालेच्या पुस्तकात मोठी मोलाची भर पडली आहे. असले उपयुक्त पुस्तक लिहून दिल्याबद्दल मी डॉ. अप्पासाहेब पवार यांचे मनापासून आभार मानते.

समाज शिक्षण प्रकाशन,<br>१९६।२४ टिळक रोड, पुणे २<br>दि. २६ सप्टेंबर १९५२

—सरोजिनी बाबर<br>संपादिका<br>समाज शिक्षणमाला, पुणे.

दुसरी आवृत्ति:—दि. ५ मार्च १९५३

अनुक्रम
विभाग

# माणसांचे मूलभूत हक्क

" मी मनुष्य आहे, यास्तव मनुष्य म्हणून जगण्याचा मला हक्क आहे, " अशा रीतीची गर्जना अनेकदा ऐकू येते. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की, माणसांच्या हजारो वर्षांच्या इतिहासात अशा प्रकारची भाषा अलीकडच्या काळातच ऐकू येऊ लागली आहे; आणि खरे म्हटले तर इ. सन १७८९ साली फ्रान्स देशात झालेल्या राज्यक्रांतीच्या वेळी जी मानवी हक्कांची घोषणा करण्यात आली, तेव्हापासूनच अशी आरोळी जोरात ऐकू येऊ लागली आहे. माणुसकीला उजाळा देणारी ही हाक क्रांतीतून निर्माण झाली ही गोष्ट खरी, पण गेल्या दीडशे वर्षांत मानवी हक्काचा पाढा इतक्या वेळा आणि अशा रीतीने पढण्यात आला आणि पढविण्यातही आलेला आहे की, आता या घोषणेत काही नवीनपणा राहिलेला नाही. एके काळचा हा क्रांतिनाद आज एखाद्या मधुर संगिताप्रमाणे आळापिला जातो आहे. आणि आता तर ही गोष्ट सगळ्या जगाला मान्य झालेली आहे. आता ता. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीने " मानवांच्या हक्कांची जागतिक घोषणा " केली; आणि अशा या हक्काची

## प्रास्ताविक

‘ समाज शिक्षण माला ’ सुरू होऊन दोन वर्षे झाली. मालेने आतापर्यंत २४ पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. आता ‘ माणसांचे मूलभूत हक्क ’ हे मालेचे तिसऱ्या वर्षाचे पहिले व एकूण पंचविसावे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. पंचविसावे पुस्तक म्हणजे रौप्य-महोत्सवाचे पुस्तक होय. हा महोत्सव आज ता. २६ सप्टेंबर रोजी होत असल्याने हे पुस्तक थोडे लवकर प्रसिद्ध होत आहे.

हे पुस्तक आहेही तसेच महत्त्वाचे. आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाला आपले हक्क तरी कोणते आहेत, हे कळणे जरूर आहे. हे पुस्तक हे हक्क चांगल्या रीतीने समजावून देईल. मालेच्या नेहमीच्या पुस्तकांच्या मानाने हे पुस्तक दुप्पट झाले असूनही ते आम्ही कायम वर्गणीदाराना त्यांच्या वर्गणीतच देत आहो. ह्या पुस्तकाचे लेखक डॉ. अप्पासाहेब गणपतराव पवार हे एम्. ए., एल्‌एल्. बी., पीएच्. डी., बार अ‍ॅट् लॉ असून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे व गुजरायेतील विसनगरच्या कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून त्यानी काम केले आहे. विसनगर येथे असतानाच आमच्या विनंतीस मान देऊन त्यानी मालेसाठी हे पुस्तक लिहून दिले आहे. आता डॉ. पवार हे पुण्याला डेप्युटी डायरेक्टर ऑफ् एज्यु. म्हणून बदलून आलेले आहेत.

ह्या पुस्तकाने मालेच्या पुस्तकात मोठी मोलाची भर पडली आहे. असले उपयुक्त पुस्तक लिहून दिल्याबद्दल मी डॉ. अप्पासाहेब पवार यांचे मनापासून आभार मानते.

समाज शिक्षण प्रकाशन,
१९६।२४ टिळक रोड, पुणे २
दि. २६ सप्टेंबर १९५२

—सरोजिनी बाबर
संपादिका
समाज शिक्षणमाला, पुणे.

दुसरी आवृत्तिः—दि. ५ मार्च १९५३.

# माणसांचे मूलभूत हक्क

" मी मनुष्य आहे, यास्तव मनुष्य म्हणून जगण्याचा मला हक्क आहे, " अशा रीतीची गर्जना अनेकदा ऐकू येते. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की, माणसांच्या हजारो वर्षांच्या इतिहासात अशा प्रकारची भाषा अलीकडच्या काळातच ऐकू येऊ लागली आहे; आणि खरे म्हटले तर इ. सन १७८९ साली फ्रान्स देशात झालेल्या राज्यक्रांतीच्या वेळी जी मानवी हक्कांची घोषणा करण्यात आली, तेव्हापासूनच अशी आरोळी जोरात ऐकू येऊ लागली आहे. माणुसकीला उजाळा देणारी ही हाक क्रांतीतून निर्माण झाली ही गोष्ट खरी, पण गेल्या दीडशे वर्षांत मानवी हक्काचा पाढा इतक्या वेळा आणि अशा रीतीने पढण्यात आला आणि पढविण्यातही आलेला आहे की, आता या घोषणेत काही नवीनपणा राहिलेला नाही. एके काळचा हा क्रांतिनाद आज एकाद्या मधुर संगिताप्रमाणे आळापिला जातो आहे. आणि आता तर ही गोष्ट सगळ्या जगाला मान्य झालेली आहे. आता ता. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीने " मानवांच्या हक्कांची जागतिक घोषणा " केली; आणि अशा या हक्काची

सर्वांना पसंत झालेली एक यादी प्रसिद्ध केली. या बाबतचा विचार पुढे ओघानेच व्हावयाचा आहे.

माणसाच्या हक्कांची पूर्वी कधी कल्पना आलीच नव्हती असे नाही. परंतु समाजाची रचनाच अशा तऱ्हेने होत गेली की, माणसाला माणूस म्हणून काही तरी विशेष स्थान आहे या गोष्टीला महत्त्व प्राप्त झाले नाही. याला जी कारणे झाली त्यापैकी दोहोंचा उल्लेख या ठिकाणी करणे उपयोगाचे होईल. त्यापैकी पहिले कारण गुलामीची चाल आणि दुसरे कारण जातिबंधन हे होय. कोणत्या का कारणाने असेना गुलामीची चाल हजारो वर्षेपर्यंत रूढ होती आणि लाखो लोक गुलामीत खितपत पडलेले असत. जनावरांच्या पलीकडची वागणूक गुलामाना मिळत असे. अशा स्थितीत त्याना माणूस कोण म्हणणार? अतिशय नवलाची गोष्ट ही की, प्राचीनकाळच्या ग्रीस देशाने ज्या सुधारणेचा कळस उभारलेला होता, त्या सुधारणेची उभारणीच मुळी गुलामांच्या परिश्रमावर झालेली होती. रोमन राज्यकर्त्यांनी आपल्या गुलामाना ज्या कायद्यानी जखडून ठेविलेले होते, ते कायदे काळीज नसलेले आणि जीव घेणारे कायदे म्हणून प्रसिद्धच आहेत. गुलामाप्रमाणे शेतावर राबणारा असा एक वर्ग मधल्या काळात युरोपात निर्माण झाला. त्या कष्टकऱ्यांची कुटुंबे म्हणजे मालकाच्या शेताचा एक निर्जीव भाग असेच मानण्यात येत होते. एका मालकाने दुसऱ्याला आपली जमीन विकली, म्हणजे त्या जमिनीबरोबर ती कुटुंबेही

विकली जात होती. अशा गुलामीच्या स्थितीतल्या माणसाला माणूस म्हणून काय किंमत असणार ? आणि मानवी हक्कांची कल्पना तरी कोठून येणार ?

अशीच गत जातीवर आधारलेल्या समाजाची झाली. जेव्हा निरनिराळ्या जातीने आपआपला जाति-धर्म पाळणे हेच पुण्य-कारक आहे, असे मानण्यात येऊ लागले, तेव्हा ह्या समाजा-तील खालच्या वर्गाची म्हणजे शूद्रांची स्थिति जवळ जवळ गुलामाप्रमाणेच झाली. काहींच्या मते शूद्रांची स्थिति गुला-मांच्यापेक्षाही वाईट होती, कारण गुलामांच्या पोटापाण्याची जबाबदारी त्यांच्या मालकावर पडत असे; पण शूद्रांच्या बाबतीत अशी कोणतीच योजना नव्हती. शूद्राना कसे वागविण्यात येत असे याचे वर्णन न केलेलेच बरे. अशा लोकाना माणूस म्हणणार कोण ? आणि त्याना हक्क ते कसले असणार ? 'शूद्राना हक्क' कसली ही भाषा! हजारो वर्षे अशा हालअपेष्टेच्या स्थितीत निघून गेली आणि आणखी किती वर्षे अशीच गेली असती कोणास ठाऊक! सुदैवाने देश स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारताची नवी राज्यघटना तयार करण्यात आली. तेव्हा आता कोठे शूद्रांचे भाग्य उदयास आले. त्यांच्यावरील सर्व कलंक धुऊन टाकण्यात आले आणि त्या सर्वांनाच इतरांच्या बरोबरीचे मान-ण्यात येऊन इतरांच्या सारखेच हक्क त्यानाही देण्यात आले. युरोपियन लोकाशी आपला जो संबंध आला त्याचे सर्वच परिणाम चांगले झाले नाहीत ही गोष्ट खरी आहे. पण ज्या

लोकाना शिवूनही घेतले जात नव्हते, त्यांच्या सुधारणेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, बाहेरच्या जगाशी आपला जो जवळचा संबंध आला, त्यामुळेच आपल्या समाजातील ह्या अभागी वर्गाच्या उद्धाराच्या प्रयत्नाना जोर पोचला. या पूर्वी अनेक संत महात्म्यानी माणुसकीच्या धर्माचा किती तरी प्रचार केलेला होता. परंतु प्रत्यक्ष कार्य-भाग काही घडून आला नव्हता. पण आज परिस्थिति पूर्णपणे पालटली आहे. आता अस्पृश्यापासून ब्राह्मणापर्यंत सर्वजण एकाच माणुसकीच्या पातळीवर येऊन पोहोचले आहेत; आणि सर्वांना सारखेच हक्क देण्यात आलेले आहेत. भावनेच्या दृष्टीने बोलावयाचे झाल्यास ही एक दैवी घटनाच घडून आलेली आहे.

बाहेरच्या जगातसुद्धा मानवी हक्कांच्या मागणीला जो उठाव मिळाला, त्यालाही तशीच जबरदस्त कारणे झाली. माणसाला माणूस म्हणून काही "नैसर्गिक" म्हणजे जन्मतःच मिळालेले किंवा मूळचेच हक्क आहेत असा प्रचार काही शहाणे लोक पूर्वीपासून करीत होते. पण त्यातून प्रत्यक्ष असे फळ काही पदरात पडलेले नव्हते. लोकांच्या मनाला जोराचा धक्का देणाऱ्या घटना घडून आल्याशिवाय अशा रीतीचा बदल होणे शक्यच नसते. सुदैवाने अशा घटना घडून आल्या. इ. स. १७७५ मध्ये अमेरिकन लोकानी इंग्लंडविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध सुरू केले; आणि लवकरच त्यानी आपल्या स्वातंत्र्याची जाहीर घोषणाही केली (४ जुलाई १७७६). त्यांच्या ह्या स्वातंत्र्याचा

पाया कोणत्या तत्त्वावर उभारला होता, याची कल्पना त्यावेळी अमेरिकन लोकानी जो हक्कांचा एक मसुदा ( Bill of Rights ) मान्य केला, त्यावरून येते. त्या मसुद्यात म्हटले होते की, "सर्व माणसे निसर्गतः सारखीच स्वतंत्र आणि स्वायत्त ( आपल्या इच्छेप्रमाणे चालणारी ) आहेत. जो जन्माला येतो त्याला जगण्याचा आणि स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क आहे......सर्व सत्ता जनतेची आहे......सर्व जनतेच्या फायद्यासाठी आणि संरक्षणासाठीच सरकार असणे जरूर आहे."

मात्र अमेरिकन क्रांतिकारकांचा आवाज फ्रेंच क्रांतिकारकांच्या इतका दूरवर पोचला नाही. फ्रेंच क्रांतिकारकानी या पूर्वी केलेली नव्हती अशी एक नवीन गोष्ट केली. त्यानी "मानवी हक्कांची" ( Rights of Man ) यादी तयार केली आणि फ्रान्ससाठी नवीन तयार केलेल्या घटनेचा उपोद्घात म्हणून ती जोडून दिली. या यादीत एकंदर सतरा कलमे आहेत. या यादीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "देशाचा राज्यकारभार जो बिघडतो आणि जनतेला जे कष्ट सोसावे लागतात, त्याचे एकच कारण आहे, ते म्हणजे माणसाना आपल्या हक्काबद्दल असलेले अज्ञान, बेपरवाई आणि तिरस्कार हे होय."

मानवांच्या हक्कांची ही अव्वल यादी इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. तिची सविस्तर चर्चा करण्याची येथे जरुरी नाही, फक्त महत्त्वाच्या कलमांचा उल्लेख सारांशरूपाने केला म्हणजे पुरे होईल. या यादीत म्हटले आहे की, सर्व माणसे

जन्मतः स्वतंत्र आणि समान आहेत. ( Men are born, and always continue, free and equal, in respect of their rights ). मानवांचे जे मूलभूत हक्क आहेत त्यांचे संरक्षण करणे एवढे एकच काम राजसत्तेचे आहे. सर्व सत्ता जनतेच्या हाती आहे. आपल्याला हवी ती गोष्ट इतराना इजा न देता करता येण्याच्या शक्यतेला राजकीय स्वातंत्र्य म्हणतात. ( Political liberty consists in the power of doing whatever does not injure another. ) समाजाला विघातक असे काहीही करू न देणे एवढेच कायद्याचे काम आहे ( The law aught to prohibit only actions hurtful to society ). एकच कायदा सर्वांना सारखाच लागू केला गेला पाहिजे. कोणालाही त्याच्या मताबद्दल त्रास पोचता कामा नये. अर्थात् अशा व्यक्तींने आपण होऊन अंगावर संकट ओढून घेतले तर गोष्ट वेगळी. विचाराचे स्वातंत्र्य आणि उच्चाराचे म्हणजे बोलून दाखविण्याचे स्वातंत्र्य हे अत्यंत मोलाचे हक्क आहेत. परंतु त्यांचा उपयोग मात्र बेजबाबदाररीतीने होता कामा नये. राज्यकर्त्यांवर नजर ठेवण्याचा जनतेचा हक्क आहे. मिळकतीचा हक्क अभेद्य ( नाहींसा न होणारा ) आणि पवित्र असल्यामुळे केवळ जनकल्याणासाठीच या हक्काचे उल्लंघन करता येईल आणि ते सुद्धा योग्य मोबदला देऊनच.

कालांतराने फ्रेंच क्रांतिकारकानी तयार केलेली ही हक्कांची यादी काही जहाल लोकाना फिक्की वाटली. खासगी मिळकती-बद्दलचा हक्क तर त्याना चांगलाच खटकला. म्हणून ते फ्रेंच

राजक्रांतीला "पांढरपेशांची क्रांति" असे नाव ठेऊ लागले. तरी पण फ्रेंच क्रांति ही आधुनिक जगाच्या इतिहासातील एक महान अशी घटना मानली जाते. "मानवांच्या हक्कांची" जी यादी त्यावेळी तयार झाली, ती पुष्कळशी तात्त्विक स्वरूपाचीच राहिली. तिच्यापासून प्रत्यक्ष फायदा त्यावेळी फारसा झाला नाही, तरी पण मानवी हक्कांच्या या घोषणेचे पडसाद चोहोकडे उठले. हक्कांच्या या भाषेने एक तऱ्हेने मनाची पकड घेतली. विशेषतः "स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व" (Liberty, Equality and Fraternity) या ध्येयवाक्याचा ध्वनि सर्वत्र दुमदुमून राहिला. फ्रेंच राज्यक्रांति आणि तिने मानवी हक्काना दिलेला उजाळा यांची आठवण बुजू नये म्हणून की काय आपणसुद्धा आपल्या नवीन राज्यघटनेच्या आरंभीच "स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व" या मोलवान तत्त्वांचा गौरवाने उल्लेख केलेला आहे आणि त्यांच्या जोडीला "न्यायाला" ही स्थान दिलेले आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीच्याच वेळीं आणखी एक महत्त्वाची घटना घडत होती. तिची छाया सर्व जगावर पसरली आणि एका जबरदस्त शक्तीच्या रूपाने ही घटना अद्यापि आपले कार्य करीत आहे. ही घटना म्हणजे "औद्योगिक क्रांति" (Industrial Revolution) होय. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात यंत्राचा शोध लागला आणि तेव्हापासून यंत्रयुगाला सुरवात झाली. गोष्ट बरी झाली का वाईट झाली हा येथे सवाल

नाही. या ठिकाणी प्रश्न एवढाच आहे की, मानवी हक्कांच्या मागणीला पुष्टि देणाऱ्या घटना कोणत्या घडून आल्या? फ्रेंच राज्यक्रांतीने लोकांची मने गदगदून हलविली यात शंका नाही. औद्योगिक क्रांति काही अमूक एका दिवशी घडून आलेली घटना नव्हे. यंत्रांच्या निर्मितीला पुष्कळ वर्षे लागली आणि सुरवातीला तर डोळे दिपवून टाकणारा असा कोणताही भाग त्या क्रांतीत नव्हता. परंतु शेवटचा परिणाम क्रांतिकारक असा झाला, हे आता सर्वांना दिसून आलेले आहे. यंत्रयुगाचा परिणाम जीवनाच्या सर्व पैलूवर झाला. समाज-रचना जवळ जवळ बदलून गेली. पूर्वीचे उच्च-नीच थर उलटे सुलटे झाले. यंत्र-बलावर आधारलेली भांडवलशाही उदयास आली; आणि तिला तोंड देण्यासाठी मजुराना आपले संघटन करावे लागले. अशा रीतीने "संघटनेचा हक्क" प्राप्त झाला. मजूर झाला तरी मनुष्यच आहे. मनुष्याप्रमाणे त्याला वागविले पाहिजे. त्याच्या पोटाला पुरेल इतकी तरी मजुरी त्याला मिळाली पाहिजे. ज्या ठिकाणी तो काम करतो त्या ठिकाणी त्याचा जीव फुकट संकटांत पडणार नाही अशी व्यवस्था केली पाहिजे. एवढेही करून त्याला इजा पोचली तर त्याला योग्य तो मोबदला दिला पाहिजे. त्यांच्यापैकी स्त्रियाना योग्य त्या सवलती दिल्या पाहिजेत व अल्पवयी मुलाना कारखान्यात काम करण्याला बंदी केली पाहिजे. तसेच त्याना नोकरी टिकण्याची खात्री मिळाली पाहिजे. त्यांच्या कामाची वेळ ठरली पाहिजे. त्यांच्या राह-

ण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आजारीपणात त्यांच्यासाठीं दवापाण्याची योजना केली पाहिजे, वगैरे वगैरे.

या सर्व बाबी "सामाजिक सुरक्षितता" (Social Security) या सदराखाली मोडतात. मजुराना चांगल्या प्रकारे राहता येणे ही समाजाच्या दृष्टीने फार महत्त्वाची बाब आहे, कारण ते समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व गोष्टींची चर्चा करण्याचे येथे प्रयोजन नाही. भाग इतकाच आहे की, मजुराला मानव म्हणून जगण्याचा हक्क आहे आणि त्यासाठी शक्य त्या सोई केल्या गेल्या पाहिजेत, हा सिद्धांत सर्वत्र मान्य केला गेला. या तत्त्वाचा शेवट पुढे " औद्योगिक लोकशाही " ( Industrial Democracy ) च्या मागणीत झाला; आणि कारखाना चालविण्यात मजुरानाही आपल्या परीने हक्क मिळाले पाहिजेत, असे सांगण्यात येऊ लागले. याप्रमाणे मानवी हकांच्या मागणीला औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या घटनांचा बराच मोठा आधार मिळाला, हे स्पष्ट आहे.

असे असले तरी मानवी हकांचा प्रसार जो एवढा झाला, त्याला मुख्य कारण लोकशाहीचा प्रसार हेच होय. आर्थिक-दृष्ट्या आपण चालू जमान्याला यंत्रयुग म्हणतो. राजकीय-दृष्ट्या त्याला लोकशाहीचे युग म्हणणे उचित होईल. आज सर्वत्र लोकशाहीचा उदो उदो चालला आहे. पण पुष्कळ लोकाना ठाऊक नाही की, ही लोकशाही काही फार जुनी नाही. गेल्या शंभर दीडशे वर्षातच तिचा विस्तार झालेला

आहे. आणि लॉर्ड ब्राईससारख्या लोकशाहीच्या चाणाक्ष अभ्यासकाचे म्हणणे आहे की, लोकशाही कायमपणे अस्तित्वात राहील अशी हमीही देता येणार नाही. ही राज्यपद्धति यशस्वी करण्याला काही गुण लागतात. ते मिळेनासे झाले की, लोकशाही पद्धति आपोआपच नाश पावते. ॲरिस्टॉटल वगैरे ग्रीक तत्त्ववेत्त्यानी तर पूर्वीच सांगून ठेविले आहे की, कोणतीही राज्यपद्धति कायमपणे टिकून राहात नाही, त्याला कारण बदलती परिस्थिति आणि राजकर्त्यांमध्ये होत असलेला बदल होय. त्यामुळे एकामागून दुसरी राज्यपद्धति अस्तित्वात येत असते.

खुद्द ग्रीक लोकानी लोकशाहीचा प्रयोग करून पाहिला होता, ' डेमॉक्रसी ' म्हणजे लोकशाही हा शब्दप्रयोगही ग्रीकांच्या पासूनच आलेला आहे. पण प्राचीन कालीन ग्रीक देशांतील लोकशाही आणि आधुनिक लोकशाही या दोहोत एक मोठा फरक आहे. ग्रीसमध्ये गुलामीची प्रथा चालू होती. त्यामुळे जवळजवळ तिसरा हिस्सा लोकांचा राज्यकारभाराशी संबंध येत नव्हता. ज्या गुलामाना साधे माणुसकीचे हक्क नव्हते, त्याना राज्यकारभारात कोणते स्थान मिळणार? आजची लोकशाही, तत्त्वाच्या दृष्टीने तरी सर्वांच्यासाठी आहे, कोणत्या एका वर्गासाठी नाही. पण गमतीची गोष्ट अशी आहे की, अशा तऱ्हेची लोकशाही खऱ्या खुऱ्या अर्थाने अगदी अलीकडेच दिसू लागली आहे. आणि काही देशात तर तशी ती अजूनही दिसत नाही. समानता हा लोकशाहीचा आत्मा

१९३१ का.ना. १९८ ५१२

आहे. ही समानता सर्वत्र सारख्या प्रमाणात अद्यापि दिसून येत नाही. इंग्लंड देशाचे उदाहरण या ठिकाणी मनो-रंजक होईल. हा देश सदा लोकशाहीच्या आघाडीवर राहिला आहे. किंबहुना असे म्हटले तरी चालेल की, आधुनिक काळात लोकशाहीची सुरवात इंग्लंडमध्येच झाली. याच कारणासाठी इंग्लंडच्या पार्लमेंटला मातृसंस्था ( Mother of Parliaments ) असे मानण्यात येते. पण याच इंग्लंड देशांत सन १८३२ पर्यंत पार्लमेंटच्या निवडणुका म्हणजे जवळ जवळ एक फार्स होता. सर्व जनतेला मतदानाचे हक्क नव्हते. लोकांचे प्रतिनिधि व लोकसंख्या यांच्यामध्ये संबंध नव्हता. हे जगजाहीर आहे की काही निर्जन ठिकाणचे प्रतिनिधिही निवडले ( ? ) जात असत ! पार्लमेंटच्या जागा खरेदी घेणेही शक्य होते. सन १८३२ मध्यें पहिल्या प्रथम काही मतदानाचे अधिकार जन-तेला देण्यात आले. ते मिळकतीच्या किमतीवर आधारलेले होते. आणि तसे म्हटले तर या कायद्याप्रमाणे फार थोड्या लोकाना मतदानाचे हक्क मिळाले. तरी पण हा कायदा कर-ण्यासाठी जंगजंग पछाडावे लागले. पुढे अशाच तऱ्हेचे कायदे करावे लागले आणि हळू हळू मतदारांच्या संख्येत वाढ होत गेली. शेवटी १९१८ मध्ये सर्वांना मतदानाचा हक्क मिळाला. तरी देखील स्त्रिया आणि पुरुष या दोहोत फरक करण्यात आलाच. लढत चालू राहिली आणि पुढे १९२८ मध्ये स्त्रिया आणि पुरुष या सर्वांना सारखे मतदानाचे हक्क प्राप्त झाले.

इंग्लंड देश लोकशाहीचा बालेकिल्ला मानला जातो. त्या देशातील जनतेने १२१५ पासून आपल्या हक्कासाठी आपल्या राजाच्या बरोबर भांडावयास सुरुवात केली होती. ह्याच इंग्लंड देशात १९२८ पर्यंत खऱ्या अर्थाने लोकशाहीचे हक्क सर्वांना समानतेने मिळालेले नव्हते, तेव्हा दुनियेतील इतर देशात लोकशाहीची वाढ कशी झाली असेल, याची कल्पनाच केलेली बरी. आपण लोक एका अर्थाने थोडे भाग्यवान ठरतो. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर लोकशाहीचे सर्व हक्क आपणाला मिळाले आहेत. आपल्या नवीन घटनेनुसार भारतातील सर्व नागरिकाना मूलभूत म्हणजे जन्माबरोबर प्राप्त झालेले हक्क देण्यात आलेले आहेत. यांचा उल्लेख पुढे व्हावयाचाच आहे.

लोकशाहीचा मानवी हक्काशी किती निगडित संबंध आहे याचा उहापोह करण्याची जरुरी दिसत नाही. लोकशाही म्हणजे “लोकांचे, लोकासाठी, आणि लोकानी चालविलेले राज्य.” खऱ्या लोकशाहीत मूळ सत्ता लोकांच्या हातात असणार. आपला कारभार आपण संभाळणार. अर्थात् लोकशाहीच्या राज्यकारभारालाही काही तरी पद्धत ही लागतेच. आणि पद्धतीला धरून व्यवहार होत गेले तरच लोकशाही टिकेल. पण मुद्दयाची गोष्ट अशी की, लोकशाहीत जनतेला जास्तीत जास्त मानाचे स्थान प्राप्त होते; आणि सर्व तऱ्हेच्या हक्कांचा जास्तीत जास्त लाभ होतो.

याप्रमाणे अमेरिकन आणि फ्रेंच राज्यक्रांतीने मानवी हक्काना

साकार रूप देण्याचा प्रयत्न केला; औद्योगिक क्रांतीने मजूर लोकांच्या हक्कांचा प्रश्न उत्पन्न करून ओघानेच मानवी हक्कांच्या मागणीला चालना दिली; आणि लोकशाहीने मानवी हक्कांना मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

या मानवी हक्काबद्दलची चर्चा पुष्कळच विस्तृत रूपाने करता येणे शक्य आहे. पण अशा लांबलचक उहापोहाला या ठिकाणी स्थान नाही. म्हणून खाली दिलेल्या मुख्य मुख्य बाबींचाच उल्लेख करण्याचे योजिलेले आहे:—

(१) हक्काबद्दलची खरी कल्पना.
(२) हक्क आणि जबाबदारी.
(३) मूलभूत हक्कांचे प्रयोजन.
(४) राष्ट्रसंघाने मान्य केलेली मूलभूत हक्कांची यादी.
(५) भारताच्या नवीन राज्यघटनेत नमूद केलेले मूलभूत हक्क.
(६) हक्कांची जोपासना.

## हक्काबद्दलची खरी कल्पना

आज जे खासगी मिळकतीचे हक्क उपलब्ध आहेत, त्यावरून हक्क ही चीज काय आहे याची कल्पना चांगल्या रीतीने करता येते. कारण खासगी मिळकतीच्या हक्काएवढे जिव्हाळ्याचे आणि चिवट हक्क दुसरे कोणतेही नाहीत म्हटले तरी चालेल.

'मी' आणि 'माझे' या गोष्टीची कल्पना लहानपणापासूनच येऊ लागते. एखाद्या वस्तूवर आपलेपणाचा हक्क शाबीत झाल्यावर त्या हक्काचे संरक्षण किती कसोशीने करण्यात येते, हे लहान मुलांच्या वागणुकीतही दिसून येते. सख्खे भाऊ असले तरी आपआपल्या चीजवस्तूबद्दल सावधान असतात; आणि सख्या बहिणीसुद्धा एखाद्या बाहुलीसाठी भयंकर भांडताना आढळतात. जी गोष्ट मुले करतात तीच मोठी माणसेही करतात. घराच्या पडक्या भिंतीवरून माणसांची डोकी फुटलेली आहेत; आणि वीतभर जमिनीच्या तुकड्यासाठी सारी जिंदगी धुळीला मिळालेली आहे! आपण बसलेली जागा दुसरा कोणी बळकावू लागला, तर लढाईचाच प्रसंग उद्भवतो; आणि आगगाडीच्या डब्यात शिरताना कोणी अडविल्यास तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोचते.

ज्यानी परमार्थाचा मार्ग अवलंबिलेला आहे, त्यांच्या मनात हे ममत्व किंवा आपलेपण येणार नाही, त्याचप्रमाणे ज्यांची बुद्धि ठीक तऱ्हेने काम करीत नाही आणि ज्याना आपले व परके याची नीट जाणीव नाही, त्यानाही वरीलप्रमाणे ह्या गोष्टीचा त्रास होणार नाही. परंतु दुनियेत अशा प्रकारच्या सर्व लोकांची मिळून होणारी संख्या इतकी कमी आहे की, नित्याच्या व्हवहारात ते नाहीत असेच समजणे योग्य होईल. सर्व साधारणपणे ममत्वाची उमग सर्वांना येतेच.

या ममत्वाचेच नाव हक्क असे आहे. जी वस्तु आपली असे

आपण मानतो तिच्याबद्दलचे सर्व अधिकार आपण गाजवायला तयार होतो. या अधिकाराचा पाया दुसरा तिसरा कोणता नसून आपला त्या वस्तूवरचा मालकी हक्क हा होय. ती आपण स्वतःच्या कष्टाने मिळविलेली असो, अथवा ती फुकटाफुकट मिळालेली असो, तिच्यावर आपण कशा रीतीने ताबा बसविला आहे, ही गोष्ट या ठिकाणी महत्त्वाची नाही. आपला तिच्यावरचा मालकी हक्क एकदा मान्य झाला की काम झाले. आपल्या हक्काच्या वस्तूचा आपण उपभोग घेऊ शकतो; दुसऱ्याना ती तबदील करू शकतो, म्हणजे देऊन टाकू शकतो; आणि आपल्या मृत्यूनंतर सुद्धा तिच्याबद्दलची व्यवस्था काय करावयाची ते ठरवू शकतो. असे हे खासगी मिळकतीबाबतचे वेगवेगळे हक्क आहेत. हे हक्क खासगी अथवा वैयक्तिक स्वरूपाचे आहेत. याचे कारण या हक्कांचा उपभोग त्या वस्तूवर हक्क सांगणाऱ्या व्यक्तीनाच घेता येतो. बाकीच्याना नाही. माझ्या वस्तूवर माझा ताबा चालतो. तिचा उपयोग कसा करावयाचा मी ठरविणार. ही माझी खासगी बाब आहे. त्यात कोणी अडथळा आणू लागला, तर कायद्याने बंदी करण्यात येते. माझ्या जमिनीची वहिवाट करण्याचा माझा हक्क आहे. त्या वहिवाटीला कोणी विनाकारण उपद्रव करू लागला, तर मला कायद्याचे संरक्षण मिळते. माझे घर जर कोणी बळकावून बसला असला, तर त्याला हकलून काढण्याचा माझा हक्क आहे. अर्थात् हे खरे आहे की, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने केव्हा

केव्हा माझ्या अशा प्रकारच्या खासगी हक्कांच्या उपभोगाच्या बाबतीतही काही नियंत्रणे घालण्यात आलेली आहेत. मोटार गाडी माझी स्वतःची आहे म्हणून मला ती वाटेल त्या ठिकाणी हवी तशी चालविता येणार नाही. हमरस्त्याने गाडी चालविण्याचे काही नियम आहेत; आणि अनेक ठिकाणी ठरवून दिलेल्या गतीपेक्षा जास्त गतीने गाडी हाकणे, गुन्हा होतो.

खासगी हक्काखेरीज आणि त्याच्याहून निराळे व अधिक महत्त्वाचे असे दुसरेही हक्क आहेत. ते सार्वजनिक स्वरूपाचे आहेत. माझ्या बंगल्याच्या आवारात एकादी चांगली सडक असली तरी ती माझी खाजगी मिळकत आहे. तिच्यावरून जाण्याचा हक्क माझा आहे. माझ्या संमतीशिवाय दुसऱ्याना त्या वाटेने जाता येणार नाही. परंतु गावातील बाजारच्या सडकेने कोणालाही जाता येते. ती सार्वजनिक सडक आहे. तिचा योग्य तो उपयोग करण्याचा सर्वांनाच सारखा हक्क आहे. कोणालाही ती बळकावून बसता येणार नाही. अशा रीतीने खासगी हक्क आणि सार्वजनिक हक्क या दोहोतील फरक स्पष्ट आहेत. खाजगी हक्क एक किंवा अधिक अशा ठराविक व्यक्तींच्याच मालकीचे असतात. त्यानाच त्या हक्कांचा उपभोग घेण्याचा अधिकार असतो. सार्वजनिक हक्क सर्वांच्याच मालकीचे असतात. त्यांचा सर्वांनाच सारख्या प्रमाणात उपभोग घेता येतो. सार्वजनिक रस्त्याचे जे उदाहरण वर घेतलेले आहे, त्यावरून ही बाब स्पष्ट होते. सार्वजनिक रस्त्याने कोणालाही जाता येते.

परंतु " हा रहदारीचा रस्ता नव्हे " अशी पाटी जेथे लाविलेली असते, अशा रस्त्याने विना परवानगी जाणे म्हणजे नसते संकट ओढवून घेण्यासारखे आहे. खासगी रस्त्याने विना अधिकार जाणे गुन्हा होतो. सार्वजनिक रस्त्याने येणाजाण्याऱ्याना विना अधिकार रोकणे हाही गुन्हा होतो.

खासगी आणि सार्वजनिक हक्कामधील तात्त्विक फरक फार महत्त्वाचा आहे, माणसांच्या मूलभूत हक्कांच्या मागणीमागील हेतु हाच आहे. व्यक्तीचे खासगी स्वरूपाचे हक्क शक्य तितके कमी करून सगळ्या जनतेचे हक्क शक्य तितके अधिक प्रमाणात वाढवावे हाच तो हेतु होय. या गोष्टींची चर्चा पुढे ओघाने व्हावयाचीच आहे.

हक्कांच्या बाबतची ही ढोबळ माहिती दिल्यानंतर त्यांच्या तात्त्विक भूमिकेचाही थोडा विचार करणे हिताचे होईल. सर्व हक्कांची दोन अंगे आहेत. एक सामाजिक आणि दुसरे वैयक्तिक. सिद्धांताच्या रूपाने असे म्हणता येईल की, ( अ ) सर्व हक्क सामाजिक स्वरूपाचे आहेत; पण त्याचबरोबर (ब) ते व्यक्तीच्या विकासासाठीही आहेत. या तत्त्वाचे स्पष्टीकरण करणे जरुरीचे आहे.

( अ ) सर्व हक्क सामाजिक आहेत.

समाजाचा एक घटक म्हणूनच मनुष्याला हक्क प्राप्त झालेले आहेत. एवढेच नव्हे तर मनुष्य समाज करून राहिला

आहे म्हणूनच हक्कांचा प्रश्न उत्पन्न होतो, नाही तर रॉबिन्सन् क्रूसोसारखी एकादी व्यक्ति निर्मनुष्य अशा बेटावर जाऊन वस्ती करून राहू लागली, तर त्या ठिकाणी हक्कांचा प्रश्नच उद्भवत नाही. एका इंग्रजी कवितेत म्हटल्याप्रमाणे ही व्यक्ति म्हणू शकते की, " जे जे माझ्या दृष्टिपथात येते म्हणजे डोळ्याना दिसते, त्या त्या सर्वांचा मी राजा आहे. " या आपोआप मनात उत्पन्न झालेल्या राजेपणाच्या कल्पनेला विरोध करावयाला तेथे आहे कोण ? अमुक वस्तु माझी आहे असे म्हणण्याचा प्रश्न निर्माण होतो केव्हा ? जेव्हा कोणी दुसरी व्यक्ति त्या वस्तूवर आपलेपणाचा हक्क सांगावयास पुढे येते तेव्हा. अर्थात् ज्या वस्तूवर आपलेपणाचा हक्क बसू शकत नाही, किंवा ज्या वस्तु निसर्गाने इतक्या विपुल प्रमाणात उत्पन्न केलेल्या आहेत की, त्यांची वाटणी करण्याचे कारणच पडत नाही, त्यांच्याबाबत हक्काची गोष्ट निर्माण होत नाही. आकाशाच्या पोकळीवर आपला हक्क आपण बसवू शकत नाही. ( मात्र ही गोष्ट राष्ट्राना शक्य आहे. कायद्याच्या मान्यतेने देशाच्या वर पसरलेली आकाशाची पोकळीसुद्धा त्या देशाच्या मालकीची होते हा प्रश्न विमानांच्या उडण्यामुळे उत्पन्न होतो. ) ज्या वेळी लोकसंख्या अगदी थोडी होती आणि जमीन विपुल होती, त्यावेळी जमीनीच्या वाटणीचा प्रश्नच नव्हता. ज्याला जेवढी पाहिजे तेवढी जमीन त्याने करावी. मात्र ही सवलत फार कालपर्यंत

टिकू शकली नाही. जनसंख्या वाढू लागली, जमीन अपुरी पडू लागली, तेव्हा तिचे तुकडे झाले, आणि एक एक तुकड्याचा एक एक मालक होऊन बसला. अशा प्रकारे मनुष्य समाज करून राहू लागल्यामुळेच वस्तूच्या वाटणीचे कारण पडले. समाज आहे म्हणूनच हक्क निर्माण झाले.

'सर्व हक्क सामाजिक आहेत' या सिद्धांताचा अभ्यास बारकाईने व्हावयास पाहिजे. परंतु येथे इतका अवकाश नाही. तरी पण चालू विषयाशी संबंध येणाऱ्या एक दोन बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. समाजात राहिल्यामुळे मनुष्याला हक्क मिळतात. यास्तव समाजहिताच्या विरुद्ध असे कोणतेही हक्क मनुष्याला मिळणार नाहीत. समाजाचे हित जास्तीत जास्त जेणेकरून होईल अशा गोष्टी व्यक्तींनी केल्या पाहिजेत, आणि समाजहिताला विघातक असे काहीही करता कामा नये. निदान अशा विघातक गोष्टी करण्याचा राजरोस हक्क तरी कोणाला मिळणार नाही. 'बारा खून माफ' असल्याबद्दलच्या सनदा पूर्वी कोणाला मिळाल्या असल्या तर असतील; पण आधुनिक कालात समाजाचा मुडदा पाडण्याची सनद कोणाला बहाल करण्यात आलेली नाही. समाजकंटक होणे भूषण नाही दूषण आहे. अर्थात् समाजाचे हित कशाला म्हणावयाचे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. परंतु त्याची छाननी करण्याला येथे अवकाश नाही.

'सर्व हक्क सामाजिक आहेत' हाचा दुसराही अर्थ असा होतो की, आपल्या हक्कांचा उपभोग घेत असताना व्यक्तीला या गोष्टीची जाणीव पाहिजे की, जे हक्क मी उपभोगतो आहे ते हक्क केवळ सजाजामुळेच मला मिळाले आहेत. खासगी हक्कावर माझी पुरी मालकी आहे आणि त्यांचा मी मनाला वाटेल त्या तऱ्हेने उपभोग घेऊ शकतो ही गोष्ट खरी आहे. परंतु जे हक्क मला मिळाले आहेत ते केवळ एक व्यक्ति म्हणून मिळालेले नाहीत, तर समाजाचा एक घटक म्हणून मिळालेले आहेत. यास्तव त्या हक्कांचा उपभोग केवळ माझ्या वैयक्तिक गरजा पुऱ्या करण्यासाठी मी करणे हे अयोग्य आणि अन्याय्य आहे. माझ्या मालमत्तेचा उपयोग करताना समाजाची आठवण मला राहिली पाहिजे. आणि दुर्दैवाने अशी आठवण मला होत नसेल, तर तशी आठवण करून देण्याची मुभा समाजाला पाहिजे. एक हजार एकर जमीन माझ्या स्वाधीन आहे, म्हणून इतरांच्या तोंडावर मारून मी हवी ती चंगळ करू लागलो, तर समाजाला ती गोष्ट सहन होणार नाही. कारण पुष्कळदा व्यक्तीने काहीही न करता तिला समाजामुळेच फायदा होण्याचा संभव असतो. लहानमोठ्या शहरातून जागेच्या किमती इतक्या वाढल्या आहेत की, पूर्वी शे पाचशेला जी जागा कोणी घ्यावयास तयार नव्हता, तिच्यावर आता सर्वांच्या उड्या पडत आहेत; आणि पाचपन्नास हजारालाही ती जागा आता महाग वाटत नाही! किमतीची ही वाढ करण्यात मालकाचे तसूभर देखील प्रयत्न कारणीभूत

झालेले नाहीत. दैववशात् गोष्टी घडून आल्या म्हटले तरी चालेल. अशा स्थितीत फुकटचे पाचपन्नास हजार हबकण्याला कोणाला काय अधिकार आहे ? अशा किंमतवाढीला अर्थशास्त्रात " न मिळविलेली मूलवृद्धि" ( unearned increment ) असेच म्हटलेले आहे. ही वाढ सामाजिक जीवनातील फेरबदलामुळे झालेली आहे, यास्तव समाजाला त्या वाढीचा फायदा मिळाला पाहिजे, असो. भावार्थ एवढाच की, जे खासगी मिळकतीचे हक्क आहेत, त्यांचा उपयोग करतानासुद्धा समाजाच्या गरजांची आठवण ठेवावी लागते. कारण हे हक्क जे मिळाले आहेत ते समाजामुळेच मिळाले आहेत. जे हक्क सार्वजनिक स्वरूपाचे आहेत, त्यांच्याबाबत काही अधिक लिहिण्याचे कारणच नाही.

( ब ) हक्क हे व्यक्तीच्या विकासासाठी आहेत.

व्यक्ति व्यक्ति मिळून समाज होतो. परंतु समाजाच्या या निर्मितीत व्यक्तीचे व्यक्तित्व गमावले जात नाही. त्याचे स्वतंत्र महत्त्व राहात असतेच. समाज फार बलवान झाला आणि जुन्या पुराण्या गोष्टींना चिकटून राहिला, म्हणजे स्वतंत्र्य मतवादी व्यक्तींना बराच त्रास भोगावा लागतो. समाजाशी टक्कर देणे पुष्कळ कठीण होते. हे सगळे जरी खरे असले तरी व्यक्तीचे व्यक्तिमत्व कायम राहते. एवढेच नव्हे तर व्यक्तीचे व्यक्तिमत्व जितके जितके निराळे आणि जोरदार असेल तितके

तितके विशेषपण समाजाला प्राप्त होते. व्यक्तिरूपी कच्च्या मालाचा समाजरूपी पक्का माल तयार होतो. तेव्हा मुळातील रूप, रंग, गुण, धर्म सर्व काही तयार मालात कमी अधिक प्रमाणात पाहावयाला मिळणार. समाजात मोठ्या व्यक्ति असल्या तर मोठा समाज होतो. 'सुसंस्कृत समाज' याचा अर्थ त्या समाजातील सर्व साधारण व्यक्ति सुसंस्कृत म्हणजे सुधारलेली किंवा मोठ्या मनाची आहे, असाच होतो. ही गोष्ट खरी आहे की, समाजात राहिल्यामुळे व्यक्तीच्या वाढीवरही परिणाम होतो. व्यक्ति आणि समाज या दोहोंमध्ये फार निकटचे संबंध आहेत; आणि आधुनिक समाजशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणे व्यक्तीचा विकास चांगल्या प्रकारे होण्याला समाजाची जरुरी आहे. परंतु या ठिकाणी मुख्य प्रश्न आहे की, व्यक्तीच्या कमी अधिक उंचीमुळे समाजाच्या उंचीवर परिणाम होतो किंवा नाही? याला उत्तर परिणाम जरूर होतो, हे आहे.

यावरून लक्षांत येईल की, एकाद्या व्यक्तीची योग्य वाढ होणे हे केवळ त्या व्यक्तीच्याच फायद्याचे नाही, तर पर्यायाने समाजाच्याही ते फायद्याचे आहे. म्हणून आपल्या व्यक्तिमत्वाची वाढ करणे हीच व्यक्तीची खरी महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. याचा अर्थ प्रत्येकजण कोणी फार मोठा माणूस होणार आहे असा नव्हे. मी किती का लहान मनुष्य असेना, पण मला अशी संधि मिळाली पाहिजे की, जिच्यामुळे माझ्यात असलेल्या गुणांची जास्तीत जास्त वाढ मला करता येईल.

असे जर झाले तर माझी उंची जास्तीत जास्त वाढेल; आणि हीच गोष्ट इतर सर्व व्यक्तींची झाली तर समाजाजीही उंची आपोआपच जास्तीत जास्त वाढेल.

जन्माला येऊन जास्तीत जास्त जे काही मला होता येईल ते होण्याचा माझा हक्क आहे. मला शिक्षणाचा हक्क यासाठी आहे की, ते शिक्षग घेऊन माझ्या शरिराची, मनाची आणि बुद्धीची वाढ मला जास्तीत जास्त करता येईल. मला कमीत कमी वेतन मिळण्याचा हक्कही अशासाठी पाहिजे की, त्यामुळे नित्याच्या गरजा भागविण्यातच माझा जन्म खर्च होणार नाही; आणि हातातोंडाची गाठ पडेना झाली म्हणजे जी वाईट अवस्था निर्माण होते, तीतच मला खितपत पडावे लागणार नाही. अशा रीतीने जे जे हक्क मी मागतो आहे, त्याचा मुख्य उद्देश एकच आहे. तो म्हणजे माझ्या व्यक्तिमत्वाची होईल तितकी वाढ मला करता यावी; आणि तसे झाले म्हणजे माझ्या जीवनाचेही सार्थक झाले असे होईल.

वर सांगितल्याप्रमाणे सर्व हक्क सामाजिक आहेत आणि ते व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या वृद्धीसाठी आहेत. या दोन गोष्टी कदाचित् परस्पर विरोधी वाटतील, पण तशा त्या नाहीत. व्यक्तींच्या भलाईवर समाजाची भलाई अवलंबून आहे. हक्कांचा योग्य उपयोग केल्यामुळे व्यक्ति मोठ्या पदाला पोचल्या, त्यांचा उत्कर्ष झाला, त्यांचा उदो उदो झाला की,

तेवढ्या प्रमाणात समाजाचेही चांगले झाले, असे म्हणावयास हरकत नाही. एवढ्यासाठी व्यक्तींना हक्कांची जरूरी आहे. मला माझ्या अंगांत असलेल्या गुणांची वाढ करण्याला वावच मिळाला नाही, तर माझे जिणे फुकट गेले, असेच म्हणावे लागेल. माझे तर त्यामुळे नुकसान होईलच, पण शेवटी समाजाचेही नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. कारण समाजाच्या मोठेपणाला, चांगुलपणाला किंवा अन्य कोणत्याही गुणसंपत्तीला माझ्याकडून मदत मिळाली असती, ती मग मिळणार नाही. म्हणून सर्व हक्कांचे एकच काम आहे. ते म्हणजे व्यक्तीची चांगल्या रीतीने वाढ करणे. आणि सर्व हक्क सामाजिक आहेत, कारण ही वाढ समाजात राहून समाजासाठी व्हावयाची आहे.

## २ हक्क आणि जबाबदारी

हक्कांच्या गोष्टी जेव्हा जेव्हा आपण लक्षात घेतो, तेव्हा तेव्हा एकच बाब आपल्या नजरेत भरते. ती म्हणजे त्या हक्कापासून होणारा लाभ अथवा त्या हक्काच्या उपभोगापासून होणारा आनंद. परंतु हक्काला दुसरी एक बाजू आहे आणि पहिल्या बाजूपेक्षाही ती अधिक महत्त्वाची आहे. ही दुसरी बाजू म्हणजे हक्कामुळे निर्माण होणारी जबाबदारी ही होय.

हक्क हे एक नाणे मानिले तर त्याच्या एका बाजूला उपयोग अथवा उपभोग आहे, तर दुसऱ्या बाजूला जबाबदारी आहे. नाण्याला एकच बाजू असू शकत नाही. त्याचप्रमाणे जबाबदारीशिवाय हक्कांचे अस्तित्वही शक्य होत नाही.

उदाहरणादाखल भाषण स्वातंत्र्याचा हक्क घ्या. मला भाषण स्वातंत्र्याचा हक्क आहे याचा अर्थ असा होतो की:—

(१) माझे जे मत आहे ते भाषणद्वारे मी व्यक्त करू शकतो.

(२) माझ्या भाषणात व्यत्यय न आणू देण्याची जबाबदारी श्रोत्यांच्यावर पडते.

(३) आणि माझे भाषण होऊ देण्याची जबाबदारी, जशी दुसऱ्यावर पडते तशीच जबाबदारी दुसऱ्याचे भाषण होऊ देण्याची मजवर पडते.

भाषणाचा हक्क म्हणजे तोंडाला येईल ते बरळण्याचा हक्क होऊ शकत नाही. बहुधा काही थोडी बंधने भाषणाच्या बाबतीत राहातातच. ही बंधने सांभाळून जे भाषण केले जाते त्यात हक्काची बाब एवढीच आहे की, माझी मते मान्य होतात किंवा अमान्य होतात याचा विचार न करता, मला बोलण्याची मुभा आहे. लोक माझे म्हणणे मानणार नाहीत, कदाचित् त्याना ते रुचणार देखील नाही, ते नाराजही होतील. इतक्या सगळ्या गोष्टी जमेस धरून देखील माझ्या भाषणाच्या हक्कात काही बाध येत नाही. लोकाना माझे भाषण आवडले नाही

४

किंवा मान्य होण्यासारखे नसले, तर ते सभेतून उठून जाऊ शकतात. ( अर्थात् शिष्टाचाराचा नियम पाळावयाचा असला, तर अप्रिय भाषणसुद्धा ऐकण्यासाठी बसले पाहिजे. सभेतून एकदम उठून जाऊ नये ). परंतु नावडते भाषण थांबविण्याचा अधिकार श्रोत्याना पोचत नाही. याचे कारणही स्पष्ट आहे. भाषण स्वातंत्र्य याचा अर्थ लोकाना आवडेल असेच भाषण करण्याची मुभा असा नाही. असा अर्थ जर केला तर ती खुशामत होईल, भाषण-स्वातंत्र्य होणार नाही. आपले जे मत असेल ते ठासून सांगण्याचा हक्क भाषण-स्वातंत्र्यात अंतर्भूत आहे. मग ते भाषण श्रोत्याना अप्रिय झाले तरी हरकत नाही. मोठमोठे बदल अप्रिय भाषणापासून झालेले आहेत; आणि मोठ्या मोठ्या वक्त्याना सुरवातीला कटु वर्तनाशी सामना करावा लागला आहे. भाषण-स्वातंत्र्य जर नसते आणि लोकाना आवडेल तेच बोलण्याची प्रथा पडली असती, तर प्रगति खुंटलीच असती. 'अप्रियस्यापि पथ्यस्य' म्हणजे हितकर असेल ते आवडत नसले तरी केले पाहिजे, हाच दंडक योग्य आहे. वक्ता वाह्यात् बोलू लागला, त्याचा तर्क चुकीचा असला, खोटा प्रचार करू लागला, किंवा उघड उघड विरोध दाखवू लागला, तर श्रोत्यांचा उपाय 'येनकेन प्रकारेण' म्हणजे वाटेल त्या मार्गाने त्याचे भाषण बंद पाडणे हा नाही. त्याना जेव्हा संधि मिळेल तेव्हा त्यानी योग्य मत प्रतिपादित करून

पूर्वीच्या भाषणाचा परिणाम दूर करणे हा तो उपाय आहे. संयम राखून अप्रिय अथवा नावडते असे भाषण देखील ऐकिले पाहिजे. भाषणाचे उत्तर भाषण आहे, कसलाही अत्याचार नाही.

माझे भाषण इतरानी ऐकिले पाहिजे असे जेव्हा मी म्हणतो, तेव्हा इतरांचे भाषण ऐकण्याची जबाबदारी माझ्यावर पडतेच. जो हक्क मला आहे तोच दुसऱ्याना आहे; आणि जी जबाबदारी इतरावर पडते तीच माझ्यावरही पडते. सरकारी रस्त्याने चालण्याचा मला अधिकार आहे तसा इतरानाही आहे. मला कोणीही आडवता कामा नये, त्याचप्रमाणे मीही कोणालाही अडविणे उचित होणार नाही. अशा रीतीने हक्क म्हणजे एका अर्थाने देवाण–घेवाणाची बाब आहे. हक्क आणि जबाबदारी या दोहोंचा मिळून एकच अर्थ होतो.

---

## ३ मूलभूत हक्कांचे प्रयोजन

सर्व हक्कांची तात्त्विक भूमिका जरी एकच असली, तरी सर्व हक्कांचे महत्त्व सारखेच नाही; निदान सर्वांचे परिणाम सारखेच होत नाहीत. मनुष्याला मनुष्यपण देणारे असे काही हक्क आहेत की, त्यांच्याशिवाय माणसात आणि जनावरात फारसा फरक राहणार नाही. पशुतेपासून मानवतेपर्यंत म्हणजे रानटीपणापासून माणुसकीपर्यंत जी उत्क्रांति किंवा सुधारणा माणसाने करून घेतलेली आहे, ती त्याच्या जागरूक प्रयत्नाचे

फळ आहे. ही उत्क्रांति पुढे चालू राहिली पाहिजे. मनुष्याच्या प्रयत्नाना आळा घालणारी कोणतीही घटना होता कामा नये

हा झाला माणुसकीचे ध्येय गाठण्याचा प्रश्न. पण दैनंदिन म्हणजे रोजच्या जीवनात देखील माणसाला माणूस म्हणून जगण्याला अडथळा येता कामा नये. एवढेच नव्हे तर माणसाला माणूस म्हणून जगण्याच्या सवलती मिळाल्या पाहिजेत. हा माणसाचा मूलभूत हक्क आहे. जो जन्माला येतो त्याला जगण्याचा हक्क आहे; आणि मानवतेच्या इतमानाने जगण्याचा हक्क आहे. "काकोऽपि जीवति बलिं च भुंक्ते" म्हणजे दिलेले पिंड खाऊन कावळाही जगतो, अशा प्रकारचे जिणे उचित नव्हे. रस्त्यावरच्या कुत्र्यामांजरांच्या जीवनात आणि माणसाच्या जीवनात फरक आहे. परमेश्वराने माणसाला आपल्या स्वतःच्या आकृतीचे रूप दिलेले आहे, असे मानण्यात येते. तर परमेश्वराच्या मोठेपणाला शोभण्यासारखे माणसाचे जीवन पाहिजे. याचा अर्थ हे जीवन ऐष-आरामी किंवा वैभव-ऐश्वर्यातील असले पाहिजे असा नाही. आर्थिक हालअपेष्टा अथवा सुख–समाधानाचाच केवळ हा प्रश्न नाही. अर्थात् आर्थिक स्वास्थ्य पाहिजेच. किमान गरजा पुरविण्याइतकी तरी मिळकत पाहिजे. त्यासाठी किमान वेतनपद्धतीची अत्यंत जरूरी आहे. आजार-पाजारात औषध–पाण्याची सोय झाली पाहिजे. खायला अन्न, रहायला घर आणि नेसायला वस्त्र ह्या अगदी

किमान गरजा झाल्या. पण तेवढ्याने काम पुरे होत नाही. मजूर असला तरी तो मनुष्य आहे. त्यालाही मन आहे, विचार आहेत, बुद्धि आहे. त्यालाही विश्रांतीची जरूरी आहे, मनोरंजनाची जरूरी आहे आणि ज्ञानाची पण जरूरी आहे. त्याच्याही शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. शिक्षणाचा हक्क हा एक मूलभूत हक्क मानला जातो. आणि ते शिक्षणही असे पाहिजे की, त्यामुळे व्यक्तीची खरी वाढ होईल. खालच्या पातळीवरील लोकाना खालीच, आणि वरच्या पातळीवरील लोकाना वरच, बसवून ठेवणारी शिक्षणपद्धति माणुसकीच्या वाढीला घातक आहे. समानतेच्या धर्मावर आधारलेली शिक्षणपद्धति पाहिजे. आणि शिक्षण अशासाठी पाहिजे की, त्यामुळे नागरिकाला आपले कर्तव्य चांगल्या रीतीने पुरे करता येईल; व समाजाचा घटक म्हणून त्याला आपले आयुष्य व्यवस्थित घालविता येईल.

प्रचलित शिक्षण पद्धतीवर लास्कीने एक चांगलाच कोरडा ओढला आहे. तो म्हणतो, " आमची शिक्षण पद्धति हे एक मोठ्यातले मोठे आश्चर्य आहे. या पद्धतीनुसार श्रीमंत आणि उच्च कुलात जन्मलेल्या मुलाना खालच्या वर्गावर हुकमत कशी गाजवावी याचे शिक्षण देण्यात येते; आणि गरिबांच्या मुलाना वरच्या दर्जाच्या लोकाशी कसे नमून वागावे हे शिकवण्यात येते. " सारांश काय, माणसाला माणूस म्हणून

जगण्याला आणि वाढण्याला ज्या हक्कांची जरूरी आहे, त्याना मूलभूत हक्क म्हणतात. ते मूलभूत या अर्थाने आहेत की, त्यांच्या बाबतीत जातपात, धर्म, लिंग, वर्ण आदि कोणतेही भेद केले जात नाहीत. सर्व माणसाना समानतेने दिले जाणारे हे मूलभूत हक्क आहेत. दुसऱ्याही एका अर्थाने ते मूलभूत मानता येतील. तो अर्थ म्हणजे, हे हक्क माणसाना कोणी दिले म्हणून त्याना ते प्राप्त झाले असे नाही, तर माणूस म्हणून माणसाना मिळणारे हक्क ते मूलभूत हक्क होत. हा अर्थ मानण्यात एक अडचण एवढीच आहे की, या हक्कांची अमलबजावणी करणारी शक्तिही पाहिजेच. आणि सर्वसारणपणे जे सरकार अस्तित्वात असेल, त्या सरकारच्या धोरणावर काही गोष्टी अवलंबून राहातात. विशिष्ट परिस्थितीत काही अडचणी उत्पन्न होणे संभवनीय आहे. तथापि मानवी हक्कांच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे असे आहे की, कोणतेही सरकार अस्तित्वात असले आणि कसलीही परिस्थिति निर्माण झाली, तरी माणसांच्या मूलभूत हक्काना काही धक्का लागता कामा नये.

मूलभूत हक्कांचे तत्त्व मान्य झाले, तरी हे हक्क कोणते असावेत याबाबत एकमत झालेले नव्हते. चार वर्षापूर्वी संयुक्त राष्ट्र-संघाने मानवी हक्कांची घोषणा करून हे हक्क कोणते असावेत हे दाखवून दिलेले आहे. तरीपण अजूनही सर्वांचे याबाबत एकमत झालेले आहे असे नाही. हे जरी खरे असले तरी सर्वसाधारणपणे माणसांच्या मूलभूत हक्कांची

रूपरेषा आता निश्चित झाल्यासारखी आहे. राष्ट्र–संघाच्या वतीने मान्य केल्या गेलेल्या हक्कांचा उल्लेख पुढे केलेला आहे.

या मूलभूत हक्कांच्या बाबतीत आणखी एका गोष्टीचा थोडासा विचार होणे जरूर आहे. माणसाचे कोणतेही हक्क त्रिकालाबाधित आहेत, म्हणजे ते कधीच बदलणार नाहीत, असे मानता कामा नये. मनुष्याला ते हक्क आहेत आणि त्याला हवे तसे ते उपयोगांत आणता येतील. पण त्याने कमी अधिक काही केले, तर तो आपल्या हक्काला मुकण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, जीवनाचा हक्क घ्या. प्रत्येकाला जगण्याचा हक्क आहे; आणि मनुष्याच्या प्राणापेक्षा अधिक महत्त्वाची दुसरी कोणतीही गोष्ट नाही, म्हणून प्रत्येकाच्या संरक्षणाची हमी घेतली पाहिजे, ही गोष्ट उघड आहे. परंतु एकाद्याने दुसऱ्याचा खून जाणून बुजून केला आणि तो खून शाबीत झाला, तर तो खून करणाराला शिक्षा व्हावयास पाहिजे. आणि अशा परिस्थितीत फाशीची शिक्षाच योग्य समजली गेली आहे. खून करणाराला फाशीची शिक्षा देणे योग्य ठरले, तर त्याच्या " जगण्याचा हक्काचे " काय झाले ? साधारण व्यवहाराच्या दृष्टीने विचार केल्यास ज्या अर्थी त्याने दुसऱ्याच्या जिवाला धोका देताना काहीच विचार केलेला नाही आणि जाणून बुजून जीव घेतला आहे, त्या अर्थी त्याने स्वतःच "जिवंत राहण्याचा हक्क" गमावला आहे. ही विचारसरणी न मानणारे लोकही आहेत. त्यांच्या मते

फाशीची शिक्षा कोणालाच केव्हाही देता कामा नये. परंतु ही गोष्ट सर्वमान्य झालेली नाही आणि फाशीची शिक्षा अनेक देशात जारी आहे.

---

## ४ राष्ट्र–संघाने मान्य केलेली मूलभूत हक्कांची यादी

इ. स. १७८९ मधे फ्रेंच क्रांतिकारकानी माणसांच्या मूलभूत हक्कांची घोषणा केली. तथापि काही लोकाना ही गोष्ट, फ्रेंचांच्या राज्यक्रांतीप्रमाणेच माथेफिरूपणाची वाटली. पण इ. स. १९४८ च्या डिसेंबर महिन्याच्या १० व्या तारखेस सगळ्या दुनियेतील मुख्य मुख्य अशा सर्व देशांच्या प्रतिनिधीनी मिळून संयुक्त राष्ट्र–संघाच्या जनरल असेंब्लीत मानवी हक्कांची जी घोषणा केली, तिला नावे ठेवायला कोण धजणार ? आणि तसे म्हटले तर फ्रेंचांच्या घोषणेपेक्षा कितीतरी अधिक गोष्टी राष्ट्रसंघाच्या घोषणेत आहेत. पण त्यांच्याविरुद्ध बोलायचे तर राहू द्या, उलट त्याना आदराने सर्वांनी मान्यता दिली आहे; आणि हे अगदी योग्य आहे. फ्रेंच क्रांति झाल्यापासून आतापर्यंत घडलेल्या अनेक गोष्टीना आलेले हे फळ आहे. माणसाचा माणूस म्हणून झालेला हा विजय आहे. अर्थात् ही गोष्ट खरी आहे की,

२६६६१

राष्ट्र–संघाने घोषणा केली म्हणून त्याप्रमाणे सर्व देशात सर्व काही ताबडतोब घडून आले, अगर येत आहे, असे नाही. या घोषणेत नमूद केलेल्या हक्कांची अंमलबजावणी सर्व देशात समाधानकारक रीतीने व्हावयाला अद्यापि अवकाश दिसतो. तरीपण मनुष्याची मनुष्य म्हणून जी प्रतिष्ठा किंवा किंमत आहे, तिला मान्यता देण्याच्या दृष्टीने आणि त्याला मनुष्य म्हणून जगण्याच्या दृष्टीने झालेल्या आजपर्यंतच्या प्रयत्नांचे स्पष्ट दिसणारे स्वरूप म्हणून राष्ट्रसंघाची ही घोषणा आहे, यात शंका नाही. ती लहान मोठ्या सर्व माणसाना तोंड-पाठ झाली पाहिजे. ही मानवी हक्कांची सनद आहे. ती सगळ्या जगाला मान्य झालेली आहे. तिचा प्रसार सर्वत्र व्हावा असा राष्ट्र–संघाचा इरादा आहे आणि तसे प्रयत्नही चालले आहेत. यासाठी सर्व जाणत्या लोकानी या सनदेचा अभ्यास केला पाहिजे आणि तिचा प्रसार केला पाहिजे.

या सनदेला एक लहानसा उपोद्घात म्हणजे आरंभीचा भाग जोडलेला असून पुढे कलमे दिलेली आहेत. कलमांची संख्या ३० आहे. उपोद्घातात ही सनद का तयार करावी लागली याची थोडक्यात पण सुंदर माहिती दिलेली आहे. नंतर साधारणपणे एका कलमात एक अशा तीस मूलभूत हक्कांचा तपशील तीस कलमामध्ये दिलेला आहे. सबंध सनदेचे शब्दशः भाषांतर या ठिकाणी देणे शक्य नाही. संक्षेपाने जरूर तेवढा भाग येथे देण्यात येत आहे.

मानवी हक्कांची जागतिक घोषणा करण्याची आवश्यकता काय आहे हे दाखवून देताना, उपोद्‌घातात म्हटले आहे की, जगात स्वातंत्र्य, न्याय, आणि शांति नांदावयाची असेल, तर माणसाची माणूस म्हणून प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. मानवी हक्काकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि त्यांची चेष्टा केल्यामुळे सद्‌सद्विवेक बुद्धीला म्हणजे बरे वाईट ठरविणाऱ्या आपल्या बुद्धीला धक्का देणारी अशी रानटी कृत्ये घडून आलेली आहेत. सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीने नवीन जगाची उभारणी अशी व्हावयाला पाहिजे की, तेथे प्रत्येकाला भाषणस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य राहील, कोणालाही भीतीच्या दडपणाखाली जगावे लागणार नाही व कोणीही भुके कंगाल राहणार नाही; आणि मनुष्याला कायदेशीर रीतीने आपले हक्क भोगायला मिळणे यासाठी जरूरीचे आहे की, नाहीतर, शेवटचा उपाय म्हणून, तो अत्याचार करणाऱ्या राज्यकारभाराविरुद्ध बंडच पुकारील.

## मानवी हक्क

(१) जन्मतः सर्व माणसे स्वतंत्र आहेत. सर्वांची सारखी प्रतिष्ठा आणि सारखे हक्क आहेत.

(२) मानवी हक्कात वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, कूळ, ‘ राजकीय अथवा दुसरे मत, ’ इत्यादींपैकी कोणत्याही कारणामुळे काही कमी अथवा अधिक होणार नाही.

(३) प्रत्येकाला जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि आपले रक्षण करण्याचा हक्क आहे.

(४) कोणालाही गुलाम करता येणार नाही. गुलामी नष्ट झाली पाहिजे.

(५) कोणाचेही हालहाल करता कामा नये. कोणालाही निर्दय, माणुसकीला सोडून अथवा लाज वाटण्यासारख्या रीतीने वागविता कामा नये, किंवा अशा तऱ्हेची शिक्षा देता कामा नये.

(६) कायद्याच्या दृष्टीने मनुष्याला मनुष्य म्हणून सगळीकडे वागविले पाहिजे.

(७) कायद्याच्या दृष्टीने सर्व माणसे सारखीच आहेत आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळाले पाहिजे.

(८) राज्यघटनेप्रमाणे किंवा कायद्याप्रमाणे मिळालेल्या मूलभूत हक्कांना बाधा आल्यास कोणालाही ठरवून दिलेल्या न्यायालयाकडे योग्य दाद मागण्याचा हक्क आहे.

(९) उगीचच कोणालाही पकडता येणार नाही, कैद करता येणार नाही, किंवा हद्दपार करता येणार नाही.

(१०) आपले हक्क शाबीत करण्याच्या बाबतीत, अथवा आपल्यावर केल्या गेलेल्या आरोपाच्या बाबतीत, स्वायत्त म्हणजे आपणास हव्या त्या आणि निःपक्षपाती न्यायालयासमोर उघड उघड चवकशी करून घेण्याचा प्रत्येकाचा हक्क आहे.

(११) ज्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप करण्यात आलेला आहे, त्याची उघड रीतीने न्यायालयात चवकशी होऊन, त्याच्यावरील आरोप योग्य रीतीने शाबीत होईपर्यंत तो निरपराधी आहे, असेच मानले गेले पाहिजे. त्याच्यावर खटला चालू असताना त्याच्या बचावाची योग्य ती तजवीज केली गेली पाहिजे. आरोपीच्या हातून घडलेले कृत्य, ज्यावेळी ते घडले त्यावेळी, राष्ट्रीय अथवा आंतर राष्ट्रीय म्हणजे आपल्या देशाच्या अथवा सर्व देशानी मिळून ठरविलेल्या कायद्याप्रमाणे, गुन्हा असे मानले गेले, तरच तो शिक्षेला पात्र होतो. ही शिक्षासुद्धा कायद्यात नमूद केलेली आहे, त्यापेक्षा जास्त देता येणार नाही.

(१२) कोणच्याही खासगी, कौटुंबिक अथवा घरगुती बाबतीत विनाकारण ढवळाढवळ करता कामा नये. कोणाच्याही पत्रव्यवहाराला उगीचच अडथळा आणता कामा नये. कोणाच्याही मान प्रतिष्ठेवर म्हणजे अब्रूवर आणि सत्कीर्तीवर म्हणजे मिळालेल्या मोठेपणावर आघात होता कामा नये. प्रत्येकाला अशा प्रकारच्या अडथळ्याविरुद्ध कायदेशीर दाद मागण्याचा हक्क आहे.

(१३) आपल्या देशात कोठेही जाण्याचा आणि राहण्याचा प्रत्येकाला हक्क आहे; देश सोडून जाण्याचा हक्क आहे; आणि परत आपल्या देशाला येण्याचा हक्क आहे.

(१४) आपल्या देशात एकाद्याचा जर छळ होत असेल, तर दुसऱ्या देशात संरक्षण मिळविण्याचा त्याला हक्क आहे.

(१५) प्रत्येकाला आपल्या राष्ट्राचा घटक म्हणवून घेण्याचा हक्क आहे.

(१६) वयात आलेल्या स्त्री-पुरुषाना वंश, राष्ट्र आणि धर्म यांचे बंधन न मानता लग्न करण्याचा हक्क आहे; आणि कुटुंबवत्सल होण्याचा हक्क आहे. लग्नाच्या वेळी, लग्न झाल्यावर, आणि काडीमोड होण्याच्या वेळी देखील स्त्री आणि पुरुष या दोघानाही सारखेच हक्क आहेत. वधू आणि वर यांच्या मनापासूनच्या व पूर्ण संमतीनेच लग्न झाले पाहिजे. कुटुंबव्यवस्था हे समाजाचे नैसर्गिक आणि मूलभूत अंग आहे. यास्तव कुटुंबव्यस्थेला समाजाचे आणि राष्ट्राचे पाठबळ मिळाले पाहिजे.

(१७) प्रत्येकाला मिळकतीचा हक्क आहे. बेकायदेशीर रीतीने कोणाचीही मिळकत हिरावून घेता येणार नाही.

(१८) प्रत्येकाला विचार–स्वातंत्र्य, सद्सद्विवेक–स्वातंत्र्य, आणि धर्म–स्वातंत्र्य आहे. प्रत्येकाला उघड रीतीने आपल्या धर्मांप्रमाणे वागण्याचा हक्क आहे.

(१९) प्रत्येकाला मत–स्वातंत्र्य आणि उच्चार–स्वातंत्र्य आहे.

(२०) प्रत्येकाला सभा–स्वातंत्र्य आणि संघ–स्वातंत्र्य आहे. पण कोणालाही बळजोरीने एखाद्या संघात सामील करता येणार नाही.

(२१) आपल्या देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष स्वतः अथवा निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या द्वारा, भाग घेण्याचा प्रत्येकाला हक्क आहे.

सरकारी नोकरीत शिरण्याचा सर्वांना सारखा हक्क आहे.

सरकारची हुकमत जनमतावर आधारलेली असली पाहिजे. यासाठी वेळोवेळी निवडणुका झाल्या पाहिजेत आणि त्या सचोटीने झाल्या पाहिजेत. या निवडणुकीत सर्वांना सारखा मतदानाचा हक्क पाहिजे; आणि या निवडणुका गुप्तमतदान पद्धतीने झाल्या पाहिजेत.

(२२) समाजाचा घटक या नात्याने प्रत्येकाला शाश्वति वाटली पाहिजे; आणि प्रत्येकाला आपल्या राष्ट्राच्या प्रयत्नाने व आंतरराष्ट्रीय सहकार्याने असे आर्थिक,

सामाजिक व सांस्कृतिक हक्क उपलब्ध झाले पाहिजेत की, त्यांच्यामुळे त्याची प्रतिष्ठा वाढेल; व तो आपल्या व्यक्तिमत्वाची जास्तीत जास्त वाढ करू शकेल.

(२३) प्रत्येकाला काम करण्याचा हक्क आहे, आपला कामधंदा निवडण्याचा हक्क आहे, योग्य आणि अनुकूल स्थितीत काम करण्याचा हक्क आहे; आणि बेकारीपासून संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे.

सर्वांना समान कामासाठी समान वेतन मिळाले पाहिजे, यात फरक पडता कामा नये.

काम करणाऱ्या प्रत्येक माणसाला असे उचित वेतन मिळाले पाहिजे की, त्यामुळे तो व त्याचे कुटुंब माणसाला शोभेल असे जिणे जगू शकतील. याशिवाय जरूर त्या सामुहिक संरक्षणाच्या योजनांचीही मदत त्याला मिळाली पाहिजे.

स्वतःच्या हितासाठी प्रत्येकाला आपल्या धंद्याचे ट्रेड युनियन ( व्यापारी संघटना ) बनविण्याचा आणि त्यात सामील होण्याचा हक्क आहे.

(२४) प्रत्येकाला विश्रांतीचा आणि फुरसतीचा ( leisure ) हक्क आहे. प्रत्येकाच्या कामाचे तास ठराविक पाहिजेत आणि प्रत्येकाला वेळोवेळी सवेतन म्हणजे पगारी सुट्टया मिळाल्या पाहिजेत.

(२५) प्रत्येकाला आपला जीवनस्तर ( राहणीचा भाग ) असा असण्याचा हक्क आहे की, त्यामुळे त्याला आणि त्याच्या कुटुंबियाना स्वस्थता लाभेल; आणि त्याना अन्न, वस्त्र, घर, औषधोपचार व जरूर ते सामाजिक साहाय्य मिळेल. त्याचप्रमाणे बेकारी, आजार, दुर्बलता, वैधव्य, वृद्धावस्था वगैरे प्रतिकूल परिस्थितीत काही तरी आधार असण्याचा प्रत्येकाला हक्क आहे.

माता आणि मुले याना विशेष साहाय्याची जरूरी आहे.

मुले औरस असोत अगर अनौरस असोत, सर्वांना समाजाचे सारखेच संरक्षण मिळाले पाहिजे.

(२६) प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क आहे. निदान सुरवातीचे आणि बेसिक किंवा पाया असलेले शिक्षण तरी फुकट दिले गेले पाहिजे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. शास्त्रीय आणि धंदेशिक्षण सर्व साधारणपणे सर्वांच्या आटोक्यात असले पाहिजे; आणि जे लायक असतील अशा सर्वांना, सारख्या प्रमाणात, उच्च शिक्षण मिळणे शक्य असले पाहिजे.

शिक्षण अशा रीतीने दिले गेले पाहिजे की, त्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांच्या व्यक्तिमत्वाची पुरेपूर वाढ होईल; आणि मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याबद्दलचा आदर मजबूत होईल...

मुलाना कोणते शिक्षण द्यावयाचे हे ठरविण्याचा सर्व प्रथम हक्क मातापित्यांचा आहे.

(२७) आपल्या समाजातील सांस्कृतिक जीवनात भाग घ्यावयाचा व निरनिराळ्या कलांचा उपभोग घ्यावयाचा, प्रत्येकाला हक्क आहे. त्याचप्रमाणे शास्त्रीय प्रगतीपासून होणाऱ्या किफायतीत हिस्सा मिळण्याचा त्याचा हक्क आहे.

(२८) या घोषणेत नमूद केलेल्या हक्कांची व स्वातंत्र्याची पूर्णपणे अंमलबजावणी करता येईल, अशा सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा प्रत्येकाला हक्क आहे. ( Everyone is entitled to a social international order in which the rights and freedoms set forth in this Declaration can be fully realized. )

(२९) प्रत्येकाने आपले समाजकर्तव्य केलेच पाहिजे. त्यातच व्यक्तिमत्त्वाची खरी वाढ होते.

आपल्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर फक्त एवढेच कायदेशीर निर्बंध राहतील की, तेणेकरून इतरांच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा योग्य तो मुलाहिजा राखला जाईल; आणि नीति, सार्वजनिक सुव्यवस्था व सर्व जनतेचे कल्याण साधले जाईल.

(३०) या घोषणेत नमूद केलेल्या हक्काना हानि पोचविणारे कृत्य करण्याचा हक्क कोणाही व्यक्तीला, समाजाला आणि राष्ट्राला नाही.

अशी ही तीस कलमी मानवी हक्कांची सनद आहे. राष्ट्र-संघाने अशीही आशा व्यक्त केली आहे की, प्रत्येक व्यक्ति आणि समाज ही घोषणा आपल्या नजरेसमोर सदैव राखील; आणि तीत नमूद केलेल्या हक्काबद्दल आदर वाढेल, असा प्रयत्न करीत जाईल. राष्ट्र-संघाची मदार शिक्षणावर जास्त दिसते. शिक्षणाच्या मदतीने हक्कांचा प्रसार चांगल्या रीतीने होईल, असे संघाला वाटते.

---

## ५ भारताच्या नवीन राज्यघटनेत नमूद केलेले मूलभूत हक्क

आमच्या नवीन राज्यघटनेच्या प्रारंभीच ज्या उच्च तत्त्वांचा उल्लेख केलेला आहे, ती तत्त्वे मूलभूत हक्काना आधारभूत अशीच आहेत. घटनेच्या उपोद्घातात म्हणजे सुरवातीच्या भागात सर्व नागरिकाना असे आश्वासन देण्यात आलेले आहे की, " सर्वांना आर्थिक, सामाजिक, व राजकीय न्याय मिळेल, सर्वांना विचार-स्वातंत्र्य, उच्चार-स्वातंत्र्य आणि धर्म स्वातंत्र्य राहील, सर्वांचा दर्जा सारखा मानण्यात येईल व

सर्वांना समान अवसर मिळेल; आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राचे ऐक्य साधण्यासाठी सर्वांमध्ये बंधुभाव वाढविण्यात येईल." या रीतीने न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या चार खांबावर आमची नवीन घटना उभी केली गेली आहे.

या तत्त्वाना अनुसरून नागरिकाना जे हक्क देण्यात आलेले आहेत, त्यांचे दोन भाग करण्यात आलेले आहेत. एका भागात "मूलभूत हक्कां"ची नोंद करण्यात आलेली आहे; आणि दुसऱ्या भागात "आदेश देणारी तत्त्वे" (Directive Principles) नमूद करण्यात आलेली आहेत. या दोहोंचाही उल्लेख पुढे करण्यात आलेला आहे. त्यावरून दिसून येईल की, संयुक्त राष्ट्र-संघाने तयार केलेल्या यादीला धरूनच हे सर्व हक्क आहेत. 'मूलभूत हक्क' आणि 'आदेश देणारी तत्त्वें' याप्रमाणे आपल्या घटनेत जो भेद करण्यात आलेला आहे, त्याचे कारणही स्पष्ट आहे. 'मूलभूत हक्क' लागू करण्यात अडचण नाही, म्हणून ते एकदम लागू केलेले आहेत. प्रत्येक नागरिकाला हे हक्क उपभोगता येतात; आणि जर काही व्यत्यय आला, तर त्याला कायदेशीर दाद मिळू शकते. ही गोष्ट 'आदेश देणाऱ्या तत्त्वां'ची नाही. ही तत्त्वें फार महत्त्वाची आहेत. कितीतरी महत्त्वाच्या बाबींचा त्यात उल्लेख केलेला आहे. पण तो उल्लेख "हक्क" म्हणून केलेला नाही, तर "आशा" म्हणून केलेला आहे. या 'तत्त्वांच्या' शीर्षकाखाली नमूद केलेल्या अत्यंत

मूल्यवान अशा गोष्टी आज नागरिकाना उपलब्ध नाहीत, पण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने चोहोकडून प्रयत्न व्हावेत, असा आदेश घटनेत दिलेला आहे. सारांश, 'मूलभूत हक्क' अंमलांत आलेले आहेत, ' आदेश देणारी तत्त्वे ' अंमलात आलेली नाहीत. पण ती पुरी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत, असे सांगण्यात आलेले आहे. कायद्याच्या दृष्टीने घटनेतील या दोन विभागातील फरक असा आहे की, ' मूलभूत हक्कां ' पैकी कोणत्याही हक्काला बाधा आल्यास कायदेशीर इलाज करता येतो, परंतु 'आदेश देणाऱ्या तत्त्वांची भूमिका केवळ आदेश देणे, आशा प्रगट करणे, अशी असल्यामुळे या तत्त्वाप्रमाणे जर गोष्टी घडून आल्या नाहीत, तर कायदेशीर दाद मागण्याची मुभा नाही. त्यामुळे आज अस्तित्वात असलेल्या हक्कांच्या दृष्टीने त्याना तितकेसे महत्त्व नाही. पण नागरिकांच्या दृष्टीने सरकारची नीति काय असली पाहिजे; आणि सरकारानी कोणत्या कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हे विस्ताराने ' आदेशां 'च्या प्रकरणात सांगितले गेले आहे.

## आपल्या घटनेत नमूद केलेले हक्क

आपल्या घटनेचा भाग ३ रा कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांचे विवरण केलेले आहे. यातील मुख्य मुख्य हक्क संक्षिप्त रीतीने खालीलप्रमाणे आहेत.

( १ ) कायद्याच्या दृष्टीने सर्व नागरिक सारखेच आहेत आणि कायद्याचे संरक्षण सर्वांना सारखेच असते. हे हक्क सरकारला हिरावून घेता येणार नाहीत.

( २ ) धर्म, जात, वंश, लिंग आणि कूल यापैकी कोणत्याही कारणामुळे सरकार पंक्तिप्रपंच करणार नाही.

कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी जाण्याला कोणलाही बंदी नाही.

मात्र स्त्रिया, मुले आणि 'सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गा'ची उन्नति करण्यासाठी जरूर ती खास सोय करता येईल.

( ३ ) सर्व नागरिकाना खालील हक्क आहेत. पण त्यांचा उपयोग कायद्यात दिलेल्या अटींना धरूनच करता येईल. ते हक्क असे आहेतः—

( अ ) भाषण–स्वातंत्र्य.
( ब ) सभा–स्वातंत्र्य.
( क ) संघटन–स्वातंत्र्य.
( ड ) संचार–स्वातंत्र्य.
( ई ) निवास–स्वातंत्र्य.
( फ ) मिळकत–स्वातंत्र्य.
( ग ) व्यवसाय–स्वातंत्र्य.

( ४ ) सरकारी नोकरी मिळण्याच्या बाबतीत सर्वांना सरखीच संधि दिली जाईल. मात्र मागासलेल्या वर्गासाठी जरूर

पडल्यास, आणि जरूर त्या प्रमाणात, नोकरीत जागा राखून ठेविल्या जातील.

(५) अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. यास्तव अस्पृश्यतेच्या कारणाने काही जबरदस्ती झाल्यास तो गुन्हा होईल व अशी जबरदस्ती करणाराला शिक्षा होईल.

(६) कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीखेरीज अन्य कोणत्याही रीतीने नागरिकांच्या जीवनाला अथवा स्वातंत्र्याला धक्का लावता येणार नाही.

(७) चौदा वर्षाखालील मुलाना कारखान्यात आणि खाणीत कामाला लावण्याची सक्त मनाई करण्यात आलेली आहे.

(८) सर्वांना धर्म-स्वातंत्र्य आहे. पण सार्वजनिक व्यवस्था, स्वास्थ्य व नीतीच्या कारणाने काही बंधने घालण्यात आलेली आहेत.

(९) कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणाचीही मिळकत हिरावून घेता येणार नाही.

(१०) मूलभूत हक्कांच्या बाबत जरूर तेव्हा सुप्रीम कोर्टाकडे योग्य पद्धतीने दाद मागण्याचा हक्क प्रत्येकाला आहे.

सरकारच्या नीतीबाबत आदेश देणारी तत्त्वे घटनेचा भाग चौथा, कलमे ३६ ते ५१ मध्ये पूर्वी

सांगितल्याप्रमाणे "आदेश देणारी तत्त्वे" म्हणून नमूद केलेली आहेत. ती फारच महत्त्वाची आहेत. पण त्यांची विस्तारपूर्वक चर्चा करणे या ठिकाणी शक्य नसल्या कारणाने, त्यांचा थोडक्यात उल्लेख केलेला आहे.

(१) जनतेचे कल्याण करण्याचे सर्व प्रयत्न सरकार करील. त्यासाठी अशी समाजरचना करण्याचा प्रयत्न केला जाईल कीं, तीत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सर्व राष्ट्रीय जीवनाला आधारभूत होईल.

(२) सरकार अशी नीति अनुसरील की, तिच्यामुळे

(अ) स्त्री असो अथवा पुरुष असो, सर्व नागरिकाना जगण्याला पुरेसे साधन मिळेल;

(ब) ज्यामुळे सर्वांचे कल्याण साधेल अशा रीतीने राष्ट्राची साधन सामुग्री वाटली जाईल;

(क) समाजाच्या हिताला विघातक असा धनसंचय व उत्पादन–साधन–संचय होणार नाही;

(ड) स्त्री–पुरुष सर्वांना, सारख्या कामासाठी सारखा पगार मिळेल;

(ई) कामगारांचे, विशेषतः मुलांचे, स्वास्थ्य कामामुळे बिघडणार नाही;

(फ) मुले आणि तरुण यांची अशी विशेष काळजी घेण्यात येईल की, त्यांचा कोणीही गैरवाजवी फायदा घेऊ शकणार नाही.

(३) काम करण्याचा हक्क, शिक्षण मिळण्याचा हक्क, आणि बेकारी, वृद्धावस्था, आजार, दुर्बलता वगैरेंच्या परिस्थितीत सरकारी साहाय्य मिळण्याचा हक्क, या सर्व हक्कांची पूर्तता करण्याचा प्रयत्न सरकार कसोशीने करील.

(४) मजुराना ज्या स्थितीत काम करावे लागते, ती योग्य व माणसाला शोभेल अशी राहील. बाळंतपणात योग्य ती मदत देण्याची सोय केली जाईल.

(५) कारखान्यात काम करणारे आणि शेतीवर काम करणारे अशा सर्व मजुराना जीवन वेतन मिळेल, त्यांचा जीवनाचा स्तर उचित असा राहील, त्याना जरूर तो विसावा मिळेल, आणि त्याना सामाजिक व सांस्कृतिक लाभ मिळतील, अशा तऱ्हेची व्यवस्था सरकार करील.

(६) ही नवी घटना लागू केल्यापासून दहा वर्षात, १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलाना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळण्याची सोय करून देण्याचा आटोकाट प्रयत्न सरकारकडून करण्यात येईल.

( ७ ) मागासलेल्या वर्गाच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीची विशेष काळजी घेण्यात येईल.

( ८ ) अन्नांतील सत्त्व वाढविणे, जीवनस्तर उंच करणे ( राहणीचे मान सुधारणे ) आणि सार्वजनिक स्वास्थ्य सुधारणे ही आद्य कर्तव्ये आहेत, असे सरकार मानते.

वरील वर्णनावरून एक गोष्ट लक्षात आली असेल की, केवळ राजकीय स्वरूपाच्या ज्या बाबी आहेत, त्या " मूलभूत हक्क " या सदराखाली नमूद केल्या गेल्या आहेत; आणि ज्या आर्थिक बाबी आहेत, त्या " आदेश देणाऱ्या तत्त्वात " सामील झाल्या आहेत. उदाहरणार्थ, भाषण-स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य वगैरे सर्व हक्क मूलभूत हक्क म्हणून बहाल करण्यात आलेले आहेत; पण किमान वेतन, जीवन वेतन, जीवन-स्तर, आजार, बेकारी वगैरे स्थितीत मिळणारी सरकारी मदत, सार्वजनिक स्वास्थ्य, आणि शिक्षण या सर्व बाबी केवळ 'तत्त्वाच्या' रूपाने मान्य केल्या गेल्या आहेत. याचे कारणही समजण्यासारखे आहे. मूलभूत हक्कांच्यासाठी कोर्टाची मदत घेता येते. भाषण-स्वातंत्र्याच्या हक्काला बाध आल्याबरोबर कोर्टाकडे दाद मागता येते. पण जीवन-वेतन मिळत नाही म्हणून कोर्टात दावा करता येत नाही. सरकारच जेव्हा सर्व कारखाने हातात घेईल, तेव्हा जीवन-वेतनाची सोय करू शकेल. एरवी खाजगी मालकाकडून सर्व गोष्टी करून घेणे कठीण आहे. असो. अशा रीतीने, सर्व साधारणपणे आर्थिक

स्वरूपाचे जे हक्क संयुक्त राष्ट्र-संघाच्या घोषणेत आढळून येतात, ते केवळ आदर्शांच्या रूपाने आपल्या घटनेत नमूद केलेले आहेत. अर्थात् घटनेनेच असा आदेश दिलेला आहे की, शक्य तितक्या लवकर या सदिच्छांची पूर्ति करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले गेले पाहिजेत. आजचा जमाना असा आहे की, आता राजकीय हक्कांपेक्षा आर्थिक हक्कांचे महत्त्व अधिक वाटते. एका लेखकाने म्हटल्याप्रमाणे स्वातंत्र्य आणि समता या दोहोंपैकी एक तुला कोणती पाहिजे असे सर्वसाधारण व्यक्तीस विचारल्यास, ती व्यक्ति समतेकडे झुकेल. समतेचा हक्क हा बहुअंशी आर्थिक स्वरूपाचा हक्क आहे. स्वातंत्र्याचा हक्क हा बहुअंशी राजकीय स्वरूपाचा आहे.

---

## ६ हक्कांची जोपासना

ज्या हक्कांचा उल्लेख वर संक्षेपाने केलेला आहे, त्यांची अधिक चर्चा होणे योग्य होते. पण स्थलाभावी तसे केलेले नाही. जे विवेचन करण्यात आलेले आहे, त्यावरून एवढे स्पष्ट होईल की, माणसाला माणूस म्हणून मान दिला गेला पाहिजे. त्याला जगण्याचा हक्क आहे आणि तोही मानवाला शोभेल असे जिणे जगण्याचा हक्क आहे. त्याला आपले मत बनविण्याचा हक्क आहे; मत व्यक्त करण्याचा हक्क आहे; त्यासाठी सभा करण्याचा हक्क आहे; इतरांशी संघटन

करण्याचा हक्क आहे; आणि आपल्या देशांत कोठेही संचार करण्याचा व निवास करण्याचा हक्क आहे. तसेच त्याला कोणताही धंदा करण्याचा हक्क आहे; कोणताही धर्म अनुसरण्याचा हक्क आहे; न्याय मिळविण्याचा हक्क आहे; समानतेचा हक्क आहे; जीवन-वेतनाचा हक्क आहे; आजार, वार्धक्य व दुर्बलतेच्या अवस्थेत योग्य अशा सहाय्याचा हक्क आहे; आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क आहे.

अर्थात् हे सर्व हक्क सर्व देशात सारख्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. पण पुढारलेल्या लोकशाही राज्यात बहुतेक सर्व मूलभूत हक्क तेथील जनतेला लाभलेले आहेत. हे हक्क कसे मिळविले जातात या प्रश्नाची चर्चा करण्याचे कारण राहिलेले नाही. या पूर्वीच या गोष्टीचा उल्लेख केला गेला आहे. एका वाक्यात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, खऱ्या लोकशाहीची वाढ जसजशी होईल, तसतशी मूलभूत हक्कांची प्राप्ति सर्व जनतेला होईल. किंबहुना असेही म्हणता येईल की, ज्या प्रमाणात मूलभूत हक्कांचा लाभ नागरिकाना होत असेल, त्याच प्रमाणात लोकशाही यशस्वी झालेली आहे असे समजावे. या अर्थाने लोकशाहीचा मानदंड म्हणजे लोकाना प्रत्यक्ष अनुभवावयास मिळणारे मूलभूत हक्क होत.

त्याचप्रमाणे मूलभूत हक्क ही कोणी कोणास द्यावयाची बाब नाही; ती लोकानी आपल्या आपण घ्यावयाची बाब

आहे. कोणी कोणाला हक्क बहाल करीत नाही. ते मिळवावे लागतात आणि मिळाल्यानंतर ते टिकवावे लागतात.

हे हक्क टिकवावयाचे कसे, या प्रश्नाचे उत्तर या ठिकाणी थोडक्यात द्यावयाचे आहे. असे करताना एक दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी की, हे हक्क व्यक्तीच्या उपभोगासाठी नाहीत, तर समाजाच्या उत्कर्षासाठी आहेत. या हक्कांच्या उपभोगाने व्यक्तीच्या शक्तीची जास्तीत जास्त वाढ होऊन त्या वाढलेल्या शक्तीचा लाभ राष्ट्राच्या भलाईसाठी व्हावयास पाहिजे. तेव्हा व्यक्तीने या हक्कांचा दुरुपयोग करून स्वतःचे महत्त्व अथवा सामर्थ्य वाढविण्यात यश मिळविले, तर तेवढ्या प्रमाणात त्या हक्कांची पिछेहाट आपोआपच झाली असे म्हणावे लागेल. सर्व हक्कात समानतेचा हक्क प्राणभूत आहे. जोपर्यंत समानता पूर्णांशाने पाळली जाते, तोपर्यंत धोका नाही, असे मानण्यास हरकत नाही. यास्तव पहिली काळजी घेतली पाहिजे ती ही की, सर्व तऱ्हेची समानता खऱ्या अर्थाने समाजात रूढ झालेली आहे. आणि एकदा असे झाले म्हणजे डोळ्यात तेल घालून समानतेच्या हक्काची जोपासना केली पाहिजे. जोपर्यंत समाजातील सर्व व्यक्ति समान मानल्या जातात आणि प्रत्येकाला प्रत्येक गोष्टी बाबत समान हक्क आहेत, तोपर्यंत बाकीच्या हक्कांच्या बाबतीत भीति वाटण्याचे फारसे कारण राहणार नाही. समानता लोक-

शाहीचा आत्मा आहे. जेव्हा ह्या आत्म्याला हानि पोचते आणि एक अथवा अधिक व्यक्ति बलिष्ठ होऊन दुसऱ्यावर अधिकार गाजवू लागतात, तेव्हा लोकशाहीला धक्का पोचतो. एवढ्यासाठी सर्व हक्कात समानतेच्या हक्काची काळजीपूर्वक जोपासना झाली पाहिजे.

या बाबतची दुसरी गोष्ट ही की, केव्हा केव्हा प्रसंग असे उत्पन्न होतात की, मूलभूत हक्कापैकी काही अथवा सर्व हक्क काही काळापुरते तरी मुल्तवी राखावे लागतात. ( बाजूला ठेवावे लागतात. ) महायुद्ध हा असा एक प्रसंग आहे. आणि हा प्रसंग असा आहे की, या वेळी राष्ट्राच्या जीवनमरणाचे कोडे सोडवावे लागते. अशा वेळी लोकांच्या हक्काकडे लक्ष द्यावयास अवसर नसतो. एवढेच नव्हे तर मानवी स्वभाव असा काही चमत्कारिक आहे की, अशा प्रसंगाचा वाईट फायदा घेऊन काही आर्थिक फायद्यासाठी आपल्या देशाचे नुकसान करावयास तयार असणारे पुण्यात्मेही दिसून येतात ! यास्तव देश संकटात असताना मूलभूत हक्क बाजूला ठेवावे लागले आहेत. काही लेखक म्हणतात की, अशा प्रसंगीसुद्धा मुलभूत हक्क जशाच्या तसेच उपभोगता आले पाहिजेत. परंतु अनुभवाने असे दिसते की, अशा महान कठीण प्रसंगी हक्कांची बाब बाजूला सारणेच इष्ट होईल. अर्थात् येथे असे गृहीत धरण्यात येत आहे की जे काही केले जाईल, ते सर्व जनतेच्या

अंतिम कल्याणासाठीच केले जाईल, आणि संकटकालीन परिस्थिति दूर झाल्याबरोबर पुन्हा सर्व हक्क जसेच्या तसेच रूढ केले जातील. इंग्लंडने अशाच गोष्टी केल्या आहेत. इंग्लंडचा धडा या बाबतीत सर्वांना गिरवावयास हरकत नाही.

अशी संकटकालीन परिस्थिति केव्हातरीच उद्भवणार. एरवी नित्याच्या जीवनात मूलभूत हक्कात ढवळाढवळ करण्याचे कारण राहत नाही. तरीपण असा प्रसंग उद्भवला आणि आपल्या हक्कावर गदा आली तर काय करावे, हा प्रश्न उरतोच. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास मूलभूत हक्कांची जोपासना कशी करावयाची, हा प्रश्न आहे.

या प्रश्नाचे उत्तर मागेच येऊन गेले आहे. संयुक्त राष्ट्र-संघाने केलेल्या मानवी हक्कांच्या यादीत असे म्हटले आहे की, कोणाच्या हक्काना धक्का लागल्यास त्याला कायदेशीर इलाज करता आले पाहिजेत. मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठीच कोर्टाचे सहाय्य मिळविण्याचा हक्क हा एक मूलभूत हक्कच आहे. आपल्या राज्यघटनेत हीच गोष्ट स्पष्ट केलेली आहे. आपणाला दिलेल्या मूलभूत हक्काना बाधा आल्यास थेट सुप्रीम कोर्टापर्यंत जाण्याचा हक्क सर्व नागरिकाना देण्यात आलेला आहे. मूलभूत–हक्कांची जोपासना कोर्टाच्या सहाय्याने होते. यासाठी न्यायालये, त्यातल्या त्यात उच्च न्यायालये, अत्यंत निःपक्ष-पातीपणाने न्याय देणारी, बेडर व बलिष्ठ अशी असावी लागतात. न्यायालये मानवी हक्कांची रक्षक आहेत.

२८६६६ ५६

न्यायालयाच्या बाबतीत एक अडचण अशी आहे की, न्यायाधिशाला जो न्याय द्यावा लागतो, तो अंमलात असलेल्या कायद्याला धरूनच द्यावा लागतो. कायद्याप्रमाणे न्याय देणे हे न्यायाधिशाचे काम आहे. त्याला कायदा बदलता येत नाही. म्हणून कायदा ही मुख्य वस्तु आहे. आणि देशातील सत्ताधारी पक्ष कायदा बदलू शकतो. अशा रीतीने कायद्यात काही फेरबदल झाले आणि मानवी हक्काना कोठे कात्री लावण्यात आली, तर जो कायदा रूढ झाला असेल, त्या प्रमाणे न्यायालयाला न्याय द्यावा लागणार.

अशा प्रकारे, आपल्या हक्कावर जे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हल्ले होतील, त्यापासून आपले आपणच संरक्षण केले पाहिजे. या बाबतीत दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक सर्व जनतेच्या दृष्टीने आणि दुसरी व्यक्तीच्या दृष्टीने.

हक्कांची जोपासना करावयाला जनतेच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनमत ( Public Opinion ) ही होय. या बाबत विस्ताराने चर्चा केल्यास एक पुस्तिकाच तयार होईल. कारण हा विषय तितका महत्त्वाचा आहे. पण स्थलाभावी या ठिकाणी इतकेच म्हणता येईल की, लोकशाहीची उभारणी जनमतावर झालेली आहे, म्हणून लोकशाही सरकारला जनमताची कदर करावी लागते. कोणीही काहीही बडबडतो, म्हणून ते जनमत होत नाही. कोणत्याही प्रश्नावर उलटसुलट टीका होत असते, पण प्रश्न जर महत्त्वाचा असेल, तर वेग-

वेगळ्या स्वरांच्या त्या बजबजपुरीतसुद्धां असा एक ध्वनि उमटत असतो की, तो ऐकल्यावर त्याच्यावर विचार करावा लागतो. हा स्वार्थी लोकांचा संसार आहे ही गोष्ट खरी. तथापि निःस्वार्थ बुद्धीने, निःपक्षपातीपणाने, न डरता, आपले विचार बनविणारे आणि ते व्यक्त करणारे काही लोक असतात. त्यांचे लक्ष जनहितावर असते. ते बुद्धिमान असतात. ते जागरूक असतात. अशा लोकांचे विचार आणि मत सरकार जरूर विचारात घेते. लोकशाहीची खरी जोपासना अशा लोकांच्या आस्तित्वावर अवलंबून आहे; आणि हे लोकच मूलभूत हक्कांचे संरक्षक आहेत. समाजात अशा व्यक्तींची संख्या जितकी वाढेल, तितक्या प्रमाणात लोकशाहीचा पाया व मूलभूत हक्कांची इमारत भरभक्कम होत जाईल. जनमत म्हणजे अशा लोकांच्या नेतृत्वाने बनलेले मत. मूलभूत हक्कांच्या जोपासनेसाठी जनमत सदैव जागृत असले पाहिजे. जनमताचा जागता पहाराच असला पाहिजे, असे म्हणणे अधिक उचित होईल.

दुसरी गोष्ट व्यक्तीबद्दल. आपल्या हक्कांच्या जोपासनेची जबाबदारी आपणावरच पडते. प्रत्येक व्यक्तीने आपले आपले हक्क संभाळले पाहिजेत. आपली मालमत्ता जितक्या काळजीने व कसोशीने आपण संभाळतो, तितक्या काळजीने व कसोशीने आपल्या सर्व हक्कांचे पालन करावयास आपण तयार राहिले पाहिजे. जेव्हा जेव्हा आपल्या हक्कांची पायमल्ली होईल, तेव्हा तेव्हा त्यासाठी भांडावयाची तयारी पाहिजे. कोर्टकचेऱ्या

करांव्या लागल्या तर त्याही केल्या पाहिजेत. अन्य कोणतेही शिष्टसंमत मार्ग असतील तर तेही अनुसरावयाची तयारी पाहिजे. आपल्या हक्कासाठी इतरानी काहीतरी करावे व आपण गप्प बसून राहू, असे म्हटल्यास चुकीचे होईल. ज्याचे दुःख त्यानेच सोसले पाहिजे आणि ज्याचे काम त्यानेच केले पाहिजे. लोकशाहीचा हा दंडक आहे. या नियमाप्रमाणेच सर्वांचे वागणे पाहिजे. जो तो मूलभूत हक्काबद्दल जागरूक राहिला, तर त्याच्यावर आपत्ति येण्याचा फारसा संभव नाही; आणि जो तो उदासीन अथवा बेफिकिर राहिला, तर केव्हा कोणते संकट ओढवेल कोणास ठाऊक ? यादृष्टीने पाहिल्यास केवळ हक्क मिळून उपयोगाचे नाहीत. त्या हक्कांची प्रत्येकाला जाणीव पाहिजे; आणि प्रत्येकजण त्या हक्काबाबत जागृत पाहिजे. अर्थात् असंख्य लोकवस्तीच्या देशात सर्वांना हे जाणपण असेल असे संभवत नाही. तरी पण जितक्या व्यक्ति या दृष्टीने सुजाण होतील व आपआपल्या हक्काना जपतील, तितके हे हक्क बळकट होतील. जनमताचे काम जनतेकडून होईल, व्यक्तीचे काम व्यक्तीनेच केले पाहिजे. हक्काच्या बाबतीत तर ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. टेनिसनच्या कवितेतील एका ओळीची आठवण सदैव राहिली पाहिजेः—

"What rights are his that dare not strike for them ?"

"जो आपल्या हक्कासाठी दोन हात करावयास तयार नाही, त्याला हक्क कसले असणार ?"

संपादक, मुद्रक, प्रकाशक : **डॉ. सरोजिनी बाबर,** एम्. ए , पीएच्. डी.
१९६।२४ सदाशिव पेठ, पुणे २.
मुद्रणस्थळ : **आनंद मुद्रणालय,** १९६।४६ सदाशिव, पुणे २

SAMAJ SHIKSHAN MALA
( Marathi Monthly )

Reg. No. B.

# समाज शिक्षण मालेची

## पहिल्या वर्षांची प्रकाशने

१ ले. दसरा दिवाळी (ति. आ.)
लेखक–श्री. कृ. भा. बाबर

२ रे. गिरणबाबू ( ति. आ. )
लेखक–श्री. ग. ल. ठोकळ

३ रे. गावठाणातील शिकारी (दु.आ.)
लेखक–श्री. भानू शिरधनकर

४ थे. आमची वाडी ( ति. आ. )
लेखक–श्री. म. भा. भोसले

५ वे. सरकार म्हणजे कोण ?
ले.–श्री. बा. ग. जगताप ( ति. आ. )

६ वे. जात्यावरील गोड गाणी
(ति. आ.) ले.–डॉ. कु. सरोजिनी बाबर

७ वे. आमची शेतीची जनावरे
( ति. आ. ) लेखक–श्री. मधुकर जोशी

८ वे. कोणता देव पावला ! (दु. आ.)
लेखक-श्री. ना. धों. ताम्हनकर

९ वे. देवाघरची दौलत
(दु. आ.) लेखक–श्री. कृ. भा. बाबर

१० वे. तुम्ही व तुमची मुले (दु. आ.)
लेखक–प्रि. शं. व. सुखटणकर

११ वे. शिद्या वड्ड ! ( दु. आ. )
लेखक–श्री. नामदेव व्हटकर

१२ वे. मत म्हणजे काय ? (दु. अ
लेखक–ॲड्. अण्णासाहेब दौंडकर

## दुसऱ्या वर्षांची प्रकाशने

१३ वे. बोलक्या दगडांची कहा
(दु.आ.) लेखक–म. म. द. वा. पोत

१४ वे. माझे बाळ ( दु. आ. )
लेखिका–डॉ. कु. सुमति क्षेत्रमाडे

१५ वे. मीहि माणूसच आहे! (दु.
ले.–डॉ. कु. सरोजिनी बाबर

१६ वे. सिंहाची अवलाद
ले.–श्री. गोविंदस्वामी (आफळे) र

१७ वे. खेड्याचा हात
ले.–श्री. बा. भ. बोरकर

१८ वे. देव आणि राक्षस
ले.–श्री. कृ. भा. बाबर

१९ वे. आम्ही आदिवासी
ले.–कु. दुर्गा भागवत

२० वे. वगैरे वगैरे !
ले.–डॉ. कु. सरोजिनी बाबर

२१ वे. जायराणी
ले.–प्रा. म. ना. झोळ

२२ वे. काळीचा कोप
ले.–श्री. म. भा. भोसले

२३ वे. नांगराचा फाळ

मगर
मौज
र

BVBK-0404524

वा. व. ट. ख. सह रु. ३–८–० ; किरकोळ पुस्तकास ६ आणे.